


# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ८१ * नांदेड * शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# श्रीरामनवमी उत्साहात साजरी; 'जय श्रीराम'च्या जयघोषाने शहर दुमदुमले










**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– नांदेड शहरात श्रीरामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी 'जय श्रीराम'च्या जयघोषाने शहर दुमदुमले होते.

श्रीराम नवमीनिमित्त गुरुवार, दि. २६ मार्च रोजी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. गाडीपुरा येथील रेणुका माता मंदिरात आरती करून दुपारी या शोभायात्रेची सुरुवात झाली. त्यात राम रावण युद्ध झांकी, भगवान नृसिंह अवतार, ऑपरेशन सिंदूर झांकी, भोलेनाथ व साधू महात्म्यांचे देखावे, अयोध्यातील रामलल्ला मूर्ती, गोमाता प्रतिमा आदींसह देखावे सादर करण्यात आले होते. सकाळपासूनच रामभक्त शोभायात्रेच्या तयारीला लागले होते.

मागील दीड तपापासून सुरू असलेल्या परंपरेनुसार २६ मार्च रोजी श्रीराम नवमीनिमित्त प्रथम राम घाट येथील श्रीराम मंदिरात महाआरती करण्यात आली. त्यानंतर प्रभू श्रीराम यांच्या मूतीचे संतांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. या महाआरतीसाठी रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाआरती संपताच जय श्रीराम, जय सियाराम, बजरंग बली की जय... च्या जयघोषांनी परिसर दणाणून गेला. त्यानंतर रेणुका माता मंदिर गाडीपुरा येथे मूर्ती आल्यानंतर तेथे आरती घेण्यात आली. कडक उन्हात शोभायात्रा जुना मोंढा टॉवर, संतबाबा निधानसिंघ गुरुद्वारा चौक, महावीर चौक, वजिराबाद, कला मंदिर, शिवाजीनगर, महात्मा फुले पुतळा, श्रीनगर, वर्कशॉपमार्गे अशोकनगर येथील श्रीराम मंदिराकडे जाण्यासाठी सुरू झाली. या शोभायात्रेत राम रावण युद्ध झांकी, भगवान नृसिंह अवतार, ऑपरेशन सिंदूर झांकी, भोलेनाथ व साधू महात्म्यांचे देखावे, अयोध्येतील रामलल्ला मूर्ती, गोमाता प्रतिमा, तरुण-तरुणींचे ढोल ताशांचे पथक, जटायूचा जिवंत देखावा, वानर सेनेचा देखावा, राम रथाचा देखावा, श्रीराम चरित्रावरील विविध देखावे यांचा समावेश होता. या शोभा यात्रेमध्ये रामभक्तांनी दिलेल्या श्रीरामचंद्र की जय, जय सियाराम, पवनपुत्र हनुमान की जय, हर हर महादेव..च्या जयघोषाने शहर दणाणून गेले.

या शोभा यात्रेदरम्यान जुना मोंढा टॉवर, गुरुद्वारा चौक, हनुमान पेठ वजीरावाद, कला मंदिर, शिवाजीनगर, महात्माफुले पुतळा या भागात विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यात अनेक सामाजिक व राजकीय संघटनांनी महाप्रसाद, खिचडीचे वाटप, मठ्ठा, ज्यूस, बुंदी, आमरस, थंड पाणपोईची व्यवस्था केली. याचा शोभायात्रेत सहभागी झालेले रामभक्त त्याचा आस्वाद घेत होते. शोभायात्रेत सर्व महापुरुषांचे तैलचित्र लावण्यात आले होते. तसेच गुरुद्वारा चौरस्ता व वजिराबाद भागात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तेथे डॉक्टर व त्यांचे सहाय्यक रक्तदात्यांकडून रक्तांचे संकलन करीत होते. तेथेही रक्तदानासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

शोभायात्रेदरम्यान शोभा यात्रेचे स्वागत करण्यासाठी विविध ठिकाणी मंच उभारून पुष्पहार व फुलांद्वारे त्यांचे स्वागत करण्यात येत होते. त्यामुळे रामनवमीनिमित्त भव्य शोभायात्रेस उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. सुनियोजित व शांततेत तसेच उत्साहात शोभायात्रा पार पाडण्यासाठी जवळपास ७००० हजार स्वयंसेवक परिश्रम घेताना दिसत होते. डिजेच्या व ढोल ताशांच्या तालावर रामभक्त नृत्य करताना दिसत होते.

शोभायात्रेत नांदेड उत्तरचे आ. बालाजी कल्याणकर, नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर, भाजप राज्य उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला बालकल्याणच्या सभापती सदिच्छा सोनी, उपसभापती निरंजना लांडगे, नगरसेवक दिलीप कंदकुर्ते, प्रवीण साले, दिलीपसिंघ सोडी यांच्यासह अनेकांनी आरती करून शोभायात्रेत सहभाग नोंदविला. विश्व हिंदू परिषद बजरंग दल या संघटनेच्यावतीने शहरातून भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात रामभक्त सहभागी झाले होते.

### पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त

या शोभा यात्रेनिमित्त पोलीस प्रशासनाच्यावतीने कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विशेष म्हणजे स्वतः पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अर्चना पाटील, सहायक पोलीस अधीक्षक शशांथ गौडा, उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रमुखांसह आदी पोलीस अधिकारी, कर्मचारी रस्त्यावर गस्त घालत होते. प्रत्येक चौकात पोलिसांनीमोर्चे बांधणी केली होती. मिरवणूक मार्गावर ड्रोनद्वारे व सीसीटी कॅमेरांद्वारे लक्ष ठेवण्यात आले होते. मिरवणुकीतील प्रत्येक कार्यकर्त्यांची हालचाल पोलिसांच्या कॅमेऱ्यात कैद करण्यात आली.

रामनवमीनिमित्त शहरात मुख्य रस्ता भगवामय करण्यात आला होता. भगवे पताकेव भगवे झेंडे लावून श्रीराम प्रभूंच्या तैलचित्रांचे मोठे कट आऊट लावण्यात आले होते. रात्री साडेदहा वाजता सदरची शोभायात्रा अशोकनगर येथील राम मंदिरात पोहोचल्यानंतर आरती घेऊन समाप्त करण्यात आली. श्रीनगर भागात मिरवणुकीला गालबोट लावणाऱ्या दोन युवकांना भाग्यनगर पोलीस निरीक्षक संतोष तांबे व त्यांच्या टीमने तातडीने ताब्यात घेतले आहे. श्रीराम नवमी निर्विघ्न पार पाडल्याने पोलीस विभागाने श्रीराम जन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांचे व राम भक्तांचे कौतुक केले.

# जिल्ह्यातील दुचाकीसाठी ३०० तर चारचाकी वाहनधारकांना १५०० रुपयांचं इंधन मिळणार

**नांदेड (प्रतिनिधी)**– पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर देशभरात इंधन टंचाईची भीती निर्माण झाली असून त्याचे पडसाद नांदेडमध्ये उमटू लागले आहेत. सोशल मीडियावर पसरलेल्या अफवांमुळे पेट्रोल पंपांवर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या पार्श्वभुमीवर प्रशासनाकडून इंधन देण्यासाठी निर्बंध घातले आहेत.



नांदेडमधील पेट्रोल पंपांवर आता दुचाकी वाहनधारकांना केवळ ३०० रुपयांपर्यंत आणि चारचाकी वाहनधारकांना १५०० रुपयांपर्यंतच इंधन देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पेट्रोल पंप चालकांना दिल्या आहेत. शहरातील अनेक नागरिक गरजेपेक्षा जास्त इंधन साठवण्याचा प्रयत्न करत असल्याने कृत्रिम टंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळेच प्रशासनाने ही मर्यादा लागू करून इंधनाचे समतोल वितरण सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून नागरिकांना स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि केवळ आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे. इंधनाचा पुरवठा पूर्णपणे बंद झालेला नसून तो सुरळीत सुरू असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रशासनाकडून पेट्रोल पंपांवर लक्ष ठेवले जात आहे.

# देशातील इंधर पुरवठा पूर्णपणे नियंत्रणात -सरकारची माहिती

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या टंचाईबाबत सुरू असलेल्या चर्चांदरम्यान केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिलं आहे. पेट्रोलियम मंत्रायलाने स्पष्टपणे सांगितले की, देशातील इंधन पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असून परिस्थिती नियंत्रणात आहे. सरकारने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन केलं आहे. तसेच देशातील सर्व पेट्रोल पंप आणि एलपीजी वितरण केंद्रांवर पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहितीही सरकारने दिली.

पेट्रोलियम मंत्रालयाच्या माहितीनुसार, देशात कुठेही पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीची कमतरता नाही. सर्व रिटेल फ्युएल आउटलेट्सकडे पुरेसा साठा उपलब्ध असून वितरण सुरळीत सुरू आहे. पुरवठा साखळी मजबूत असून कोणत्याही प्रकारचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता सध्या नाही.


सरकारने नागरिकांना इशारा दिला आहे की, काही ठिकाणी जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा अफवांपासून दूर राहावे आणि केवळ अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा, असं मंत्रालयाने म्हटलं आहे.

मंत्रालयाने स्पष्ट शब्दांत सांगितल की, नागरिकांनी अनावश्यक साठेबाजी करू नये. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरवठा सुरळीत सुरू असल्यामुळे कोणत्याही प्रकारची घाई किंवा घबराट करण्याचे कारण नाही. जागतिक पातळीवर सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याबाबत चिंता व्यक्त होत असली, तरी भारताने परिस्थितीवर नियंत्रण ठेवलं असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

# खासगी ट्रॅव्हल डंपरला धडकली, तब्बल १३ जणांचा मृत्यू

**मार्कापुरम (प्रतिनिधी)**– आंध्र प्रदेशातील मार्कापुरम जिल्ह्यातील रायवरमजवळ खासगी ट्रॅव्हल डंपरला धडकून झालेल्या भीषण अपघातात १३ प्रवासी जिवंत जळाले. पोलिसांनी सुरुवातीला १४ जणांचा मृत्यू झाल्याचे सांगितले होते, परंतु नंतर मुख्यमंत्री कार्यालयाने मृतांच्या संख्येला अधिकृतपणे दुजोरा दिला.

या घटनेबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले की, हरिकृष्णा ट्रॅव्हल्सची बस तेलंगणातील निर्मल येथून नेल्लोरकडे जात होती. हा अपघात गुरूवारी पहाटे सहाच्या सुमारास झाला. सुमारे तीन तासांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. या घटनेनंतर डंपर चालकांसह २२ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बसमध्ये ३५ प्रवासी होते.




# ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन

**मुंबई (प्रतिनिधी)**– महाराष्ट्राचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन झालं आहे. गुरूवारी पहाटेच्या सुमारास त्यांचं निधन झाल्याची माहिती आहे. ते ८५ वर्षाचे होते.

ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ, विचारवंत आणि राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे खंदे पुरस्कर्ते डॉ. जयसिंगराव पवार यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ होती. परिणामी त्यांच्यावर रुग्णालयात उपचार देखील सुरु होते. अखेर त्यांची आज पहाटे प्राणज्योत मालवली. त्यांच्या या अकाली निधनाच्या बातमीने मराठेशाहीचा इतिहासकार हरपला अशी भावना व्यक्त केली जात आहे.डॉ. जयसिंगराव पवार यांचा जन्म ३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील तडसर येथे झाला. डॉ. जयसिंगराव पवार यांनी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम.ए. (सर्वप्रथम) आणि पीएच.डी. पदवी संपादन केली.

# नांदेड परिक्षेत्रातील गुटखा विरोधी मोहिमेत ६० आरोपी गजाआड

## दहा दिवसांत ५६ गुन्हे दाखल, ६० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड परिक्षेत्रात सुरू असलेल्या गुटखाविरोधी मोहिमेत ५६ गुन्हे दाखल करून ६० आरोपींना गजाआड करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत दहा दिवसांत ६० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १६ मार्च, २०२६ पासून, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम उघडली आहे. कॅन्सर सारख्या दुर्धर रोगांपासून, नागरिकांचा बचाव व्हावा, या दृष्टिकोनातून ही मोहीम राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेत दि. १६ मार्च ते २५ मार्च, या दहा दिवसांत, गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्या आरोपींविरुध्द कलम १२३, भारतीय न्याय संहिते अंतर्गत (५६) गुन्हे नोंदवून, अशा व्यवसायांत गुंतलेल्या (६०) आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे.

सदर मोहिमेअंतर्गत, नांदेड परिक्षेत्रात पोलीसांनी खालीलप्रमाणे कारवाया केल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ६०,२१,१८९/- रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे. या मोहिमेत नांदेड जिल्ह्यात ३०५ पानटपऱ्यांची तपासणी करून २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यासह परभणी जिल्ह्यात १२, हिंगोलीत १० व लातूर जिल्ह्यात ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून नांदेड परिक्षेत्रात एकूण ५६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मागील दहा दिवसांत पोलिसांनी परिक्षेत्रातील दोन हजारहुन अधिक दुकाने व पानटपऱ्यांची तपासणी करुन आपली मोहिम तीव्र केली आहे. सदर मोहिमेदरम्यान, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमित्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा पर्यंतच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१५०१ ००१०० हा मोबाईल क्रमांक असलेली खबर नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सॲप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# सरकारची रॉकेल वाटपास मंजुरी

**मुंबई (प्रतिनिधी)**– आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा सामना देशातील सर्वसामान्य नागरिकांनाही बसत असून गॅसटंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. एकीकडे गॅस एजन्सीमध्ये गॅस पुरवठ्याबाबत काही नियमावली तयार करण्यात आली असून व्यावसायिक गॅस पुरवठाही बंद करण्यात आला आहे. त्यातच, आता युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचं पाऊल उचललं असून केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास राज्याला मंजुरी देण्यात आली आहे.

प्रति कुटुंब किंवा शिधापत्रिका असलेल्यांना एका शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरता स्वरुपात केरोसीन वाटप केले जाणार असल्याची माहिती आहे.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

**गोदातीर समाचार**

**संपादक
केशव घोणसे पाटील**

# अंधश्रद्धेचा धोकादायक खेळ

स्वतःला ज्योतिषी आणि 'गॉडमॅन' म्हणून मिरवणाऱ्या अशोक खरात प्रकरणाने पुन्हा एकदा आपल्या समाजातील अंधश्रद्धा, भीती आणि आंधळ्या विश्वासाचा चेहरा उघड केला आहे. एखाद्या व्यक्तीचे पतन हा केवळ वैयक्तिक अपयशाचा विषय नसून, त्या व्यक्तीला वाढू देणाऱ्या आणि बळ देणाऱ्या सामाजिक व्यवस्थेचेही प्रतिबिंब असते. खरात यांच्या प्रकरणातही हेच दिसून येते. एका साध्या अंकशास्त्राच्या व्यवसायातून सुरुवात करून लाखो रुपयांच्या सल्लागार फीपर्यंत पोहोचणे, हे केवळ कौशल्याचे नव्हे तर समाजातील असुरक्षिततेचा फायदा घेण्याचे उदाहरण आहे. गेल्या काही दशकांत देशभरात अशा तथाकथित 'गॉडमॅन' आणि ज्योतिषांचा प्रभाव सातत्याने वाढत चालला आहे. लोकांच्या भीती, श्रद्धा आणि आकांक्षा यांचा संगम साधत हे लोक स्वतःभोवती एक गूढ आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व निर्माण करतात. विशेष म्हणजे स्वतःला विद्वान समजणारे मंत्री आणि राजकीय नेते देखील अशा लोकांच्या नादी लागतात, मग सामान्यांनी कुणावर विश्वास ठेवायचा? असे संधीसाधू लोक जीवनातील अडचणींना सोपे आणि त्वरित उपाय देण्याचे आश्वासन देऊन ते लोकांचा विश्वास संपादन करतात. मात्र, या विश्वासाचा गैरवापर होत असल्याची अनेक उदाहरणे वारंवार समोर येत आहेत. अशोक खरात यांनीही याच पद्धतीचा अवलंब केला असल्याचे दिसते. गावोगावी जाऊन साधी माहिती जसे की, जन्मतारीख, नाव गोळा करून त्यांनी लोकांशी संपर्क वाढवला आणि हळूहळू त्यांना मानसिकदृष्ट्या आपल्या प्रभावाखाली आणले. त्यांचे बहुभाषिक कौशल्य, परदेशातील अनुभव आणि प्रभावी संवादशैली या गोष्टींनी लोकांमध्ये विश्वास निर्माण केला. परंतु हाच विश्वास नंतर शोषणाचे साधन बनला, हे अत्यंत चिंताजनक आहे. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे लैंगिक शोषणासारख्या आरोपांचे उघड होणे. अशा प्रकारचे गुन्हे सहसा अचानक समोर येत नाहीत. त्यामागे अनेक वर्षांचा दबाव, भीती आणि गप्प राहण्याची सक्ती असते. 'दैवी शक्ती' किंवा 'विशेष ज्ञान' असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तींच्या भोवती निर्माण होणारा प्रभाव इतका प्रबळ असतो की, पीडित व्यक्तींना विरोध करण्याची किंवा आवाज उठवण्याची हिंमत होत नाही. त्यामुळेच अशा घटनांकडे केवळ गुन्हेगारी प्रकरण म्हणून न पाहता, सामाजिक समस्या म्हणून पाहणे आवश्यक आहे. खरात यांची अटक ही नक्कीच एक महत्त्वाची पायरी आहे. परंतु न्याय मिळवण्यासाठी केवळ एका व्यक्तीवर कारवाई पुरेशी ठरणार नाही. या प्रकरणाच्या निमित्ताने अशा प्रकारच्या 'गॉडमॅन संस्कृती'ला पोषक ठरणाऱ्या संपूर्ण व्यवस्थेचा शोध घेणे आवश्यक आहे. कायदे आणि नियम असूनही अशा व्यवसायांवर नियंत्रण का राहत नाही, हा प्रश्नही गंभीर आहे. लोकांच्या अडचणी आणि असुरक्षिततेचा फायदा घेत, कोणतीही वैज्ञानिक पडताळणी नसताना 'अलौकिक शक्ती'चे दावे खुलेआम केले जातात, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. म्हणूनच समाजालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. अंधश्रद्धा ही केवळ वैयक्तिक श्रद्धेचा भाग नाही किंवा विशिष्ट धर्म व जातीतील भाग नाही, तर ती शोषणाला खतपाणी घालणारी मानसिकता ठरते. कोणत्याही व्यक्तीला कोणतीही शंका न घेता 'दैवत' मानणे, आपल्या वैयक्तिक निर्णयांपासून आर्थिक व्यवहारांपर्यंत सर्व काही त्यांच्या हाती सोपवणे, ही प्रवृत्ती धोकादायक आहे. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचार आणि जागरूकता यांची कमतरता यामुळेच अशा घटना घडतात. खरात प्रकरण हे केवळ एका व्यक्तीचे नाही, तर संपूर्ण समाजासाठी एक इशारा आहे. अंधश्रद्धा आणि भीतीच्या आधारावर उभ्या राहणाऱ्या या व्यवस्थेला आळा घालण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन, कडक कायदेशीर यंत्रणा आणि सामाजिक धैर्य या तिन्ही गोष्टींची गरज आहे, अन्यथा आज खरात तर उद्या दुसरा कोणी, अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील. समाजाने आता तरी सजग होण्याची गरज आहे. श्रद्धा ही वैयक्तिक बाब असली तरी ती विवेकबुद्धीच्या चौकटीत राहिली पाहिजे. अन्यथा, श्रद्धेचे रूपांतर अंधश्रद्धेत होऊन त्यातून निर्माण होणारे परिणाम सर्व समाजाला अधिक घातक ठरतात.

# जे पेरलंय तेच उगवले हो!



जैसे ज्याचे कर्म तैसे श्र फळ देतो ईश्वर हे आपण नेहमी ऐकतो. कारण मनुष्य जसा वागतो तसे त्याला फळ मिळत असतात. म्हणून आपण जे पेरलय तेच उगवणार! ज्वारी पेरली,बाजरी उगवली असे कधी झाले काय? बघा काय पेरायचे? पेरताना बी-बियाणे उत्कृष्ट असावेत. त्यातील केरकचरा काढून टाकलेला असावा. त्याला कीड लागलेली नसावी. बी-बियाणे भाजलेले नसावे. तेव्हा सर्व पीक जमिनीतून तरारुन वर येते. म्हणून मातीत सोने उगवते असे म्हणतात. तसे मुलांच्या आई-वडिलांनी आपल्या मुलांना शुरावीरांच्या कथा सांगाव्यात. चांगल्या मित्राची संगत घालून द्यावी. कमी बोलणे जास्त ऐकणे सांगावे. चारचौघात व्यवस्थित राहणे. पेहराव चांगला घालणे. निर्व्यसनी बनविणे. या सर्व गोष्टी शिकवाव्या लागतात.

त्याच्या मनाची मशागत करावी लागते. मन स्वच्छ विचारांनी भरलेले असावे.अविचाराने बरबटून जाऊ नयेत. तेव्हा मुले म्हणजे देवाघरची फुले असे म्हणता येईल. ही फुले कोमजून जाऊ नयेत, म्हणून त्यांचे काळजी घेणे आई-वडिलांचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी मुलांना लहान वयातच संस्कार करा-जेव्हा एखाद्या पालकाचे वागणे आदर्श असते, तेव्हाच त्यांचे पाल्य सुद्धा आदर्श वागतात, त्या पालकांचा एक नैतिक धाक मुलांवर आपोआप पडतो,पण जेव्हा पालकाचेच वागणे, दुराचारी, व्यभिचारी, भ्रष्ट, कोपीष्ट, तमोगुणी असेल तर त्यांचा नैतिक धाक मुलांवर अजिबात पडत नाही. परिणामतः मुलंसुद्धा बेशिस्त, भ्रष्टाचारी, स्वैराचारी, अत्याचारी व्हायला वेळ लागत नाही. याला सर्वच कुटुंब वाईट आहेत. असे अजिबात म्हणता येणार नाही. पुष्कळ कुटुंब चांगले सुद्धा आहेत. प्रत्येक पालकाला वाटते की आपला पाल्य उत्तुंग भरारी घेऊन चांगल्या पदावर विराजमान व्हावा. मात्र उत्तम भरारीसाठी त्याच्या पंखात नैतिकचे, सत्याचे, शुद्ध आचरणाचे बळ असावे लागते.

हे बळ त्यांना कुटुंबातून वडीलधाऱ्या व्यक्तीकडून, मित्रांकडून, स्वच्छ आश्वासीत शब्दातून मिळत असते. माणूस हा कर्तबगार आहे. परंतु तो कोणाच्या सानिध्यात आहे. यावरून त्याची कर्तबगारी ठरू शकते. कर्ण पराक्रमी असूनसुद्धा समाजात प्रिय झाला नाही. हा संगतीचा परिणाम आहे.

म्हणून पालकत्वाची साधना सुरू करावी लागते. आपण आपल्या पाल्यावर निखळ प्रेम करावे लागते. त्याच्या असणाऱ्या अडीअडचणी माहिती करून घ्याव्या लागतात. आपल्या मुलांच्या समोर आपण जर पत्नीला शिव्यांची लाखोली वाहिली तर ते सुद्धा तसेच आपल्या गैरहजेरीत थोड्या प्रमाणात बोलतात. हे अजिबात खोटे नाही हे त्रिवार सत्य आहे. जे पेरले ते उगव-तच असते. खाण तशी माती म्हणतात. भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम हे आई-वडिलांकडून घडले. डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या वडिलांनी आपल्याला कसं घडवलं हे त्यांच्या आत्मचरित्रातून सांगितलं. आपण आपल्या गुरूकडून घडत असतो. हे स्वामी विवेकानंदांनी आपल्या मार्मिक शब्दातून सांगितले. मी कसा होतो आणि कसा झालो यासाठी थोरांची चरित्रे वाचावी लागतात.

जर वडीलच चुकीच्या पद्धतीने वागत असतील तर मुलांकडून काय अपेक्षा कराव्यात. मुले ती मुलंच असतात. म्हणून मुलांसोबत आपण वागते वेळेस चांगल्या पद्धतीने वागावे. मुलांच्या समोर आपण पुस्तक घेऊन वाचन करत बसलो. तर मुलं सुद्धा आपोआपच पुस्तक घेऊन बसतात. त्यामुळे एकमेकांमध्ये संवाद साधला जातो. आपल्या मुलाविषयी असलेला आपला आदरभाव, ममत्व त्या-मधून भरभरून ओसंडून वाहते. कुटुंब प्रमुख या नात्याने आई-वडिलांनी मुलांना चांगले वळण लावावे. पालकत्व निभावणे ही साधी, सोपी गोष्ट नाही, आम्ही मुलाचे पालनपोषण उत्तम प्रकारे करतो. भरपूर पैसे पुरवतो, असे जर तुम्ही बोलत असाल तर उंटावर बसून शेळ्या राखल्या सारखे आहे. बरेच जण आपल्या मुलांना सर्वासमोर तू ढ, बिनडोक आहेस? तुला काहीच कळत नाही असे चुकीचे शब्द बोलून त्याच्या मनाच्या भावना दुखावतात. त्यामुळे मुलं निराश होतात. निराशेच्या पोटी गैरमार्गाने वाममा-र्गाला जाण्याचा प्रयत्न करतात. म्हणून आध्यात्मिक आचार-विचाराचे अधिष्ठान मुलांवर असावे. मनाची जडणघडण करणे अतिशय गरजेचे आहे. शरीराचे पोषण होत असते तसे मन सुद्धा सुसंस्कारित व्हावे. श्यामची आई पुस्तकांतून मनावर संस्कार केलेले आहेत. मन मे है विश्वास, विश्वासराव नांगरे पाटील यांनी स्वतः चा आत्मविश्वास सांगितला आहे. त्याम ुळे मुलांना जर आपणाला पुढे न्यायचे असेल तर सध्याची पिढी बिघडली आहे असे बोलून चालणार नाही. घरात जर उत्तम संस्कार करायचे असेल तर घरातलं वातावरण अनुकूल व पोषक असणं गरजेचं आहे. मुलांची जडणघडण घरच्या वातावरणातूनच होत असते. जिथे घर सुसंस्कृत आहे, तेथील मुले सुद्धा तसेच सुसंस्कृत होतात. काही अपवाद असतात. झोपडपट्टीतील मुलं कसे गैरवर्तन करतात हे आपणाला इथे सांगायची आवश्यकता नाही. कारण त्यांचा परिसर गुन्हेगारीने व अस्वच्छतेने ग्रासून गेलेला आहे.


त्या ठिकाणी चांगले उगवेल याचा आपण विचारीही करू नये. कारण तुम्ही चांगले पेरलच नाही तर चांगले उगवण्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे. म्हणून मुलावर संस्कार करते वेळेस ते तुम्ही तुमच्यापासून सुरू करा. बरेच पालक मुलांना सिगारेट, मावा, गुटखा, बिडी इतर नशेली पदार्थ आणण्यासाठी बाजारात पाठवतात. वेळप्रसंगी ती मुलं त्याचा आस्वाद घ्यायला मागे पुढे पाहत नाहीत. म्हणून तुम्ही मुलांसोबत चांगले वर्तन करा. तुम्ही सुद्धा मोबाईल पाहण्याचा मोह टाळा. जोरात बोलू नका. सायंकाळी मुलं अभ्यास करताना तुम्ही सुद्धा थोडा वेळ त्यांना द्या. सकाळी मुलांना तुमच्या बरोबर लवकर उठवा, त्यांना अभ्यासाला लावून तुमचे कार्य करा. पहा मग बदल कसा जाणवतो. इतर मुलांशी तुमच्या मुलाची तुलना करू नका. बघा त्या मुलांना असं केलं, बघा त्या मुलीने तसं केलं. तुम्ही फक्त खाऊन बुडविले, माझे नाव मातीत मिसळले, घराण्याची इज्जत घातले, बाहेर दाखवायला तोंड राहिले नाही असे बोलून मुलांची मानहानी करू नका. मुलांना सर्व काही सहन होते. परंतु अपमान सहन होत नाही. त्यासाठी करी मनोरंजन जो मुलाचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे असे म्हटले जाते.

छोटी असणारी मुक्ताईनेसुद्धा आपल्या मोठ्या भावावर संस्कार केले, त्यामुळे तिने जे पेरलं ते अतिशय उत्कृष्ट उगवलं, ज्ञानीयाचा राजा संत श्रेष्ठ माऊली यांनी पसायदान लिहून विश्वाला घर करून टाकले. ही ताकद फक्त संस्कारात आहे. म्हणून आपण सुद्धा पुढे जाण्यासाठी आपल्याला संस्काराची शिदोरी महत्त्वा-ची आहे. संस्कार हे कुठूनही बाहेरून बाजारातून मिळत नाहीत, तर ते आपल्या घरातून करावे लागतात. ज्या पद्धतीने एखाद्या वृक्षाला आपण काटेरी कुंपण लावून पाणी टाकून मोठं करतो. तसेच बालकांना सुद्धा मोठे करण्यासाठी सातत्याने त्यांच्याशी हितगुज करावे लागते. तेव्हा मुलं समजदार, ज्ञानी, विचारी बनतात. अलीकडील काळाम ध्ये मुलं व्यसनी, दुराचारी, गुन्हेगारी क्षेत्राकडे का वळत आहेत. तर त्यांना मिळालेले चुकीचे संस्कार, चुकीच्या मि त्राबरोबर राहताना होत आहेत. गलिच्छ वातावरणात राहून मुलं बिघडतात. त्यासाठी पालकांनी आपापल्या मुलांच्या बुद्धिमत्तेनुसार त्यांना शिक्षण घेऊ द्यावे. शेजाऱ्यांच्या मुलांनी ९०% गुण घेतले, तुझी ५०% ची अगरबत्ती कुठे लाव-ावी, हे तीन-तीन वेळेस त्यांना म्हणून त्यांची मानसिकता खराब करू नये. तुम्ही जर मुलांना सारखे टोमणे मारत असाल तर मुलं तुम्हाला एक दिवस सोडून घरा-तून निघून जातील. अशा मुलांची संख्या सध्या दिवसेंदिवस वाढत आहे.

स्वतः आई-वडिलांना दह-ावी -बारावी परीक्षा मध्ये ३७/३८ टक्के गुण आहेत. ही पालक मंडळी आपल्या मुलांना ९६% गुण मिळावेत अशी अपेक्षा व्यक्त करतात. यावरून मुलांची संस्कार कसे करावे हे ज्यांनी त्यांनी आता स्वतः विचार करावा. काटे असणाऱ्या रस्त्याने गेल्यास काटा पायात रुतणारच, त्यासाठी सरळ धोपट मार्गाने जावावे. पुढे एक समर्पक उदाहरण देत आहोत.बंडोजी नावाच्या मुलांनी आपल्या वार्धक्यात असलेल्या आई-वडिलांना दुसऱ्या मजल्यावर राहण्यास सांगितले व तेथे एक घंटी बांधली. तुम्हाला भूक लागली की ती घंटी वाजवायची असे दरडावून सांगितले.असे काही वर्षे चालले त्यानंतर ते आई-वडील मृत्यू पावले. बंडूजीने मुलाला हळूच मृदू शब्दात सांगितले. खंडू ती घंटी आता सोडून खाली घेऊन ये. त्यावेळेस बंडू हसत वडिलांना म्हणाला आता ती घंटी सोडण्याची आवश्यकता नाही बाबा.कारण उद्यापासून तुम्ही आणि आई वरच्या मजल्यावर राहण्यासाठी जावावे. आणि भूक लागल्यास घंटी वाजवावी. जसे बंडूनी आपल्या आई-वडिलाला केले तसेच खंडूने सुद्धा तोच मार्ग अवलंबिला. म्हणूनच जसे पेराल तसे उगवते. हा सृष्टीचा नियम आहे. तेव्हा मिळालेल्या अल्प आयुष्यात सर्वांशी प्रेमाने दोन शब्द बोलून चांगले वागून मुलांना सुसंस्कारित करून आपले जीवन जगावे ही अपेक्षा!

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
निसर्ग व सामाजिक पर्यावरण
प्रदुषण निवारण मंडळ, सदस्य
अहिल्यानगर, महाराष्ट्र राज्य

# प्रदूषणाचा भस्मासुर!





स्विस संस्था आयक्युएआरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे. कारण या अहवाला-नुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरात १३ शहरे भारतातील आहेत. या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून, आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयाच्या सीमेवर असणाऱ्या बर्णीहाट हे शहर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. तर जगातील १३८ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे.

या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम-२.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३८ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ८९५४ शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, पंजाब-मधील मुलतानपूर, हरियाणामधील लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी, (राजस्थान - हरियाणा सीमेवरील राजस्थानच्या अल्वर तालुक्यातील शहर) मुझ्झफरनगर, हनुम ानगड, नोएडा या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम-२.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळी-वर आले असून, ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले.

स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षाघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत.

प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राज-धानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा लागला होता, त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे.

शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहेत. मुंबई-दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे.

स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम-विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करून ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# वन्यजीव संवर्धनाची गरज



भारताने वाघ संवर्धनाच्या दिशेने गेल्या काही वर्षांत महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. राष्ट्रीय वाघ संवर्धन प्राधिकरण आणि विविध वन्यजीव संरक्षण संस्थांच्या प्रयत्नांमुळे वाघांची संख्या वाढली असून, त्यामुळे भारताला जागतिक स्तरावर सकारात्मक ओळख मिळाली आहे. मात्र, या यशाच्या पार्श्वभूमीवर वाघांच्या अनैसर्गिक आणि रहस्यमय मृत्यूंच्या वाढत्या घटनांमुळे चिंता वाढली आहे. राष्ट्रीय वाघ संवर्धन प्राधिकरणाच्या नोंदीनुसार, २०१२ ते २०२४ या कालावधीत देशात एकूण १,४५३ वाघांचे मृत्यू झाले आहेत. यापैकी ७५३ वाघांचे मृत्यू फक्त वाघ -अभयारण्यांमध्ये झाले आहेत. गेल्या पाच वर्षांतील (२०२०-२०२४) आकडेवारी पाहिली तर, या काळात ६३१ वाघांचे मृत्यू नोंदवले गेले, यापैकी ३७९ वाघांच्या मृत्यूचे कारण अद्याप अज्ञात आहे. हे वास्तव वन्यजीव संरक्षणासाठी कार्यरत सरकारी आणि स्वयंसेवी संस्थांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते. जर एवढ्या मोठ्या प्रमाणात वाघांचा मृत्यू होत असेल आणि त्याची कारणे समजू शकत नसतील, तर याचा अर्थ असा होतो की शिकारी आणि वन्यजीव तस्करी करणारे गट अद्याप सक्रिय आहेत आणि सरकारी यंत्रणा त्यांना रोखण्यात अपयशी ठरत आहे.

वाघांच्या मृत्यूची अनेक कारणे असू शकतात, जसे की शिकारी, नैसर्गिक मृत्यू, आपसी संघर्ष, बेकायदेशीर तस्करी, पर्यावरणीय बदल आणि मानवी हस्तक्षेप. पण चिंता वाढवणारी बाब म्हणजे गेल्या पाच वर्षांत मृत्यू झालेल्या वाघांपैकी ६० टक्के वाघांच्या मृत्यूची कारणे अजूनही स्पष्ट झालेली नाहीत. हे सरकारी संस्थांच्या देखरेख व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. भारतात वाघांच्या शिकारीची समस्या अनेक दशकांपासून आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाघांची कातडी, हाडे आणि इतर अवयव यांना मोठी मागणी आहे, त्यामुळे बेकायदेशीर शिकाऱ्यांची संख्या वाढत आहे. अनेक वेळा स्थानिक शिकारी हे आंतरराष्ट्रीय तस्करी गटांसाठी काम करतात. वाघांच्या मृत्यूच्या वाढत्या घटनांवरून असे दिसते की शिकारींचे जाळे अधिक संघटित होत आहे किंवा वन विभाग आणि संरक्षण संस्थांची सतर्कता कमकुवत झाली आहे.

याशिवाय, वाघांच्या मृत्यूमागे त्यांचे नैसर्गिक अधिवास झपाट्याने नष्ट होणे हेही एक महत्त्वाचे कारण आहे. वाढती लोकसंख्या आणि शहरीकरण यामुळे जंगलांचे क्षेत्रफळ सतत कमी होत आहे, परिणामी वाघांना अन्न आणि सुरक्षित आश्रय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. जंगलांच्या नाशामुळे वाघांना मानवी वस्त्यांच्या दिशेने जावे लागते, जिथे ते मारले जातात किंवा संघर्षात जखमी होऊन मरतात. 'वाघ प्रकल्प' क्षेत्रातही वाघांच्या मृत्यूची संख्या वाढत आहे, यावरून संरक्षित क्षेत्रे वाघांसाठी पुरेशी सुरक्षित नाहीत, हे स्पष्ट होते. विशेषतः महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा वाघ अभयारण्य याचे प्रमुख उदाहरण आहे. येथे संरक्षित क्षेत्राच्या बाहेर वाघांची संख्या जास्त आहे, याचा अर्थ संरक्षित क्षेत्रांत अन्न आणि निवाऱ्याची कमतरता आहे, त्यामुळे वाघांना बाहेर जावे लागत आहे. परिणामी, मानव-वाघ संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे आणि त्यामुळे वाघांच्या मृत्यूची शक्यता आणखी वाढते.

वाघांच्या संख्येत घट होऊ नये म्हणून भारत सरकारने अनेक योजना राबवल्या आहेत, त्यापैकी 'प्रोजेक्ट टायगर' सर्वांत महत्त्वाचा आहे. तसेच, केंद्र आणि राज्य सरकारे एकत्रितपणे वाघ संवर्धनासाठी कार्यरत आहेत. मात्र, सध्याची आकडेवारी पाहता संरक्षण संस्थांनी त्यांच्या रणनीतींम ध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सरकारने वाघांच्या मृत्यूमागील कारणांचा शोध घेण्यासाठी एक मजबूत आणि पारदर्शक देखरेख यंत्रणा विकसित करायला हवी. यासाठी जंगलांमध्ये कॅमेरा ट्रॅप, ड्रोन सर्वेक्षण आणि वन अधिकाऱ्यांच्या गस्तींना अधिक प्रभावी बनवण्याची गरज आहे. याशिवाय, वन्यजीव गुन्ह्यांची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षण आणि तांत्रिक मदत द्यावी, जेणेकरून ते शिकारी गटांना पकडण्यात अधिक सक्षम होतील. त्याचबरोबर, जंगलांचे संरक्षण आणि विस्तारावर विशेष भर द्यायला हवा. सरकारने जंगलतोडीवर कठोर निर्बंध आणा-वेत आणि नवीन वन्यजीव मार्ग (कोरिडॉर) विकसित करावेत, जेणेकरून वाघांना सुरक्षित अधिवास मिळेल आणि ते मानवी वस्त्यांपासून दूर राहतील.

वाघांची वाढती संख्या हा निश्चितच भारतासाठी अभिमानास्पद मुद्दा आहे. २०१८ मध्ये भारतात २,९६७ वाघ होते, तर २०२२ मध्ये हा आकडा वाढून ३,१६७ झाला. हे म हत्त्वाचे आहे, कारण २०व्या शतकात वाघांची संख्या चिंताजनकरीत्या घटली होती, त्यामुळे १९७३ मध्ये 'प्रोजेक्ट टायगर' सुरू करावा लागला. पण वाघांचे रहस्यमय मृत्यू ही गंभीर चिंता आहे. जर वन्यजीव संरक्षण संस्था आणि सरकार या समस्येवर उपाय काढू शकले नाहीत, तर वाघांची वाढती संख्या टिकवून ठेवता येणार नाही. त्यामुळे वाघ संरक्षण हे केवळ आकडेवारीपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष अंम लबजावणीसाठी ठोस पावले उचलायला हवीत. वाघ संरक्षणाला एक सामूहिक जबाबदारी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# युद्धाच्या परिस्थितीत आर्थिक स्थैर्य राखणे भारताची मोठी कसोटी -प्राचार्या देशमुख




**नांदेड (प्रतिनिधी)–** महिला शिक्षण संस्था नांदेड संचालित के. आर.एम. महिला महाविद्यालयात युद्धाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील परिणाम या समकालीन विषयावर अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विजया देशमुख या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. हरिहर मोहकार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व स्वागतपर गीताने झाली.

यावेळी डॉ. आरती राणे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये विद्यार्थिनींना जागतिक घडा-मोडींचा अभ्यास करून त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम समजून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर प्रमुख वक्ते प्रा. डॉ. हरिहर मोहकार यांनी युद्धाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा व्यापक परिणाम स्पष्ट करताना आंतरराष्ट्रीय व्यापारातील अस्थिरता, कच्च्या तेलाच्या किंमतीतील वाढ, महागाई, तसेच पुरवठा साखळीतील अडथळे यांसारख्या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. विजया देशमुख यांनी अत्यंत विचारपूर्ण मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, आजच्या जागतिकीकरणाच्या युगात कोणत्याही एका देशातील युद्धाचा परिणाम केवळ त्या देशापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगभर उमटतात. भारतासारख्या विकसनशील देशासाठी अशा परिस्थितीत आर्थिक स्थैर्य राखणे ही मोठी कसोटी असते, असे त्यांनी नमूद केले.

त्या पुढे म्हणाल्या की, युद्धामुळे निर्माण होणारी महागाई, बेरोजगारी, तसेच आर्थिक विषमता या समस्या समाजातील सर्वसामान्य घटकांवर अधिक परिणाम करतात. त्यामुळे विद्यार्थिनींनी केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण न घेता वर्तमान घडामोडींचे भान ठेवणे गरजेचे आहे. आर्थिक निर्णयप्रक्रिया, शासनाच्या धोरणांचा अभ्यास आणि जागतिक घडामोडींचे विश्लेषण करण्याची सवय विद्यार्थिनींनी लावून घ्यावी, असे त्यांनी आवाहन केले.

डॉ. विजया देशमुख यांनी स्वावलंबन, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन (आत्मनिर्भरता) आणि संसाधनांचा योग्य वापर यावरही भर दिला. भारताने संकटकाळातही आर्थिक प्रगतीचा मार्ग शोधला असून, तरुण पिढीने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून देशाच्या विकासात योगदान द्यावे, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थिनींनी व्याख्यानानंतर उत्स्फूर्त प्रश्न विचारून चर्चेत सहभाग घेतला. या व्याख्यानामुळे विद्यार्थिनींना जागतिक परिस्थितीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम समजून घेण्यास मोठी मदत झाली.

कार्यक्रमास डॉ. आरती राणे, डॉ. योगिता पवार, प्रा. मनोज देशमुख व इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता पवार व आभार प्रा. मनोज देशमुख यांनी मानले.

# महापालिकेत महापौर मुळे यांनी घेतला आरोग्य विभागाचा आढावा




**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात वाढत्या उन्हाचा तडाखा आणि संभाव्य जलजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर महापौर कविता मुळे यांनी बुधवार, दि. २५ मार्च रोजी महापालिकेच्या आरोग्य विभागाचा सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीत शहरवासीयांच्या आरोग्यासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आणि आरोग्य सोयी-सुविधांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीस उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी-पाटील, माजी सभापती किशोर स्वामी, नगरसेवक डॉ. अंकुश देवसरकर, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठ्ठे व इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

या बैठकीत प्रामुख्याने पावसाळ्यापूर्वी आणि उन्हाळ्यातील उष्णतेमुळे होणारे आजार रोखण्यासाठी महापालिकेच्या सर्व रुग्णालयांत आणि आरोग्य केंद्रांत पुरेशा औषधांचा साठा उपलब्ध ठेवण्याचे आदेश महापौरांनी दिले. शहरात लसीकरण प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. ज्या भागात आजारांचे प्रमाण अधिक आहे, तिथे विशेष फवारणी आणि पुरीकरण करण्याचे निर्देश देण्यात आले. आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर्स आणि निमवैद्यकीय कर्मचारी गेळेवर उपस्थित राहतील, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. रुग्णांची कोणतीही गैरसोय होऊ नये, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णांसोबत औदार्य राखून त्यांचा उपचार करावा, असे महापौरांनी स्पष्ट केले.

पालिकेच्या दवाखाण्यांमध्ये सी. सी. टी. व्ही. कॅमेरे, हजेरी नोंदविण्यासाठी बायोमेट्रीक मशीन अद्ययावत करण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. विशेष करून पालिकेच्या दवाखाण्यात वापरण्यात येणारी औषधे ही आवश्यकतेनुसार मागविण्यात यावीत जेणे करून खर्चात बचत होईल. त्याचप्रमाणे औषधी ठेवण्यासाठी सुसज्ज अशा भांडाराची निर्मिती करण्याबाबत यावेळी निर्देश देण्यात आले. तसेच औषधांची परिणामकारकता संपण्यापूर्वी ती वापरात येण्याच्या दृष्टीकोणातून वेळोवेळी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यासाठी यावेळी आदेशीत करण्यात आले. नवीन धुरीकरण मशीन्स खरेदी करण्याच्या प्रस्तावासह तरोडा भागातील पालिकेच्या दवाखण्यामध्ये प्रसूती व सोनोग्राफीची सुविधा आणि शिवाजी नगर दवाखाण्यामध्ये नव्याने ट्रॉमा सेंटर सुरू करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

नागरिकांनी आपल्या परिसरातील स्वच्छता राखावी आणि आरोग्याच्या तक्रारी असल्यास त्वरित जवळच्या महानगरपालिका आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. शहर रोगमुक्त ठेवण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे, असे आवाहन महापौरांनी यावेळी केले.

## आपले सरकार सेवा केंद्र वाटपाची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीद्वारे होणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** आपले सरकार सेवा केंद्र वाटपाची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीव्दारे केली जाणार असून, अर्जदारांनी ऑनलाईन दाखल केलेल्या कागपत्रांचे आधारे शासन निर्णयानुसार पुढीलप्रमाणे गुणांकन करण्यात येणार आहे.

कोणत्याही शाखेचा पदवीधर असल्यास ३० गुण, कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर असल्यास २५ गुण, सीएससी केंद्र असल्यास २५ गुण याप्रमाणे गुणांकन राहील.

एका गावासाठी एकापेक्षा जास्त अर्जदार असतील आणि त्यांचे गुण समान असतील तरच मुलाखत घेतली जाईल. मुलाखतीसाठी २० गुण निश्चित आहेत. मुलाखतीच्या गुणांची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

तांत्रिक ज्ञान असल्यास ६ गुण, लोकसेवा हक्क अधिनियम २०२५ चे ज्ञान असल्यास ४ गुण, सामान्य ज्ञान व व्यक्तिमत्व, सामाजिक क्षेत्रात राबविलेले उपक्रम अथवा सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा अनुभव असल्यास- १० गुण.

या समितीचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष तर पोलीस अधीक्षक, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्त नांदेड वाघाळा महानगर पालीका, अधीक्षक राज्य उत्पादन शुक्ल, अधीक्षक भूमी अभिलेख, प्राचार्य श्री गुरु गोविंदसिंघजी अभियांत्रीकी महाविद्यालय, प्राचार्य शासकीय तंत्र निकेतन, महाप्रबंधक भारत संचार निगम लिमिटेड नांदेड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत जि.प.नांदेड, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, शिक्षणाधिकारी(मा.) जि.प., शिक्षणाधिकारी (प्रा.) जि.प., जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प., जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी जि.का. हे सर्व सदस्य आहेत. तर सेतू समितीचे सदस्य सचिव हे निवासी उपजिल्हाधिकारी आहेत.

## २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे तर ॲड. गोरक्ष लोखंडे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

- खा. श्रीमंत शाहू छत्रपती, खा. प्रा. रवींद्र चव्हाण, नितीन चंदनशिवेंसह दिग्गजांना निमंत्रण
- दिवंगत आमदार नामदेवराव व्हटकर यांना मरणोत्तर 'भीमरत्न' पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील सत्यशोधक विचार मंच आणि नांदेड वाघाळा शहर मनपा कामगार - कर्मचारी युनियन (रौप्य महोत्सव वर्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले- शाहू- आंबेडकर- साठे- कर्डक प्रेरणेच्या २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन दि. ९ मे २०२६ रोजी करण्यात आले आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी पुरोगामी विचारवंत, प्रख्यात लेखक, संपादक संजय आवटे यांची निवड करण्यात आली असून, संमेलनास खा. श्रीमंत शाहू छत्रपती, कोल्हापूर, खा. प्रा. रवींद्र चव्हाण, ज्येष्ठ नाटककार दत्ता भगत, दंगलकार नितीन चंदनशिवे, प्रा. रवीचंद्र हडसनकर, प्रा. जगदीश कदम, डॉ. विजय कदम आणि डॉ. जयवंतराव व्हटकर यांसह अनेक दिग्गजांची उपस्थिती राहणार आहे.

संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य, प्रख्यात विचारवंत ॲड. गोरक्ष लोखंडे यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संयोजक गणेश शिंगे, स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, निमंत्रक जी. पी. मिसाळे, मुख्य समन्वयक ॲड. विजय गोणारकर, सहसंयोजक लालबाजी घाटे, संयोजन समितीचे अध्यक्ष उन्मेश ढवळे व कार्याध्यक्ष मारोती कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सत्यशोधक विचार मंचचे अध्यक्ष कोंडदेव हाटकर, सचिव श्रावण नरवाडे, उपाध्यक्ष राज गोडबोले, सल्लागार भीमराव हाटकर, प्रभू ढवळे, एन. टी. पंडित, रमेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाड चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी आणि राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीच्या ऐतिहासिक पर्वावर होणाऱ्या या संमेलनात बी. आर. फाऊंडेशन नांदेड द्वारा भीमरत्न पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. हा पुरस्कार दिवंगत आमदार नामदेवराव व्हटकर यांना जाहीर झाला आहे. नामदेवराव व्हटकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाची चित्रफीत तयार केली असून, हा अनमोल ठेवा त्यांनी युगानुयुगांकरिता दिला आहे. याकरिता त्यांनी आपले उदरनिर्वाहाचे साधन प्रिंटींग प्रेस व राहते घर विकून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आगळीवेगळी आदरांजली अर्पण केली आहे. त्यांच्या निःस्वार्थ, निःस्पृह व अस्सीम निष्ठेला मानाचा मुजरा म्हणून समाजातून या पुरस्काराद्वारे कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी दिवंगत नामदेवराव व्हटकर यांचे चिरंजीव डॉ. जयवंतराव व्हटकर परिवारासह उपस्थित राहणार आहेत.

## दोन लाखांपर्यंत शेती किंवा पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ; शेतकऱ्यांना दिलासा



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला असून, दोन लाखांपर्यंत शेती किंवा पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क दिनांक १ जानेवारी २०२६ पासून पूर्णपणे माफ केले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व बँका, वित्तीय संस्थांनी त्वरित अंमलबजावणी करण्याचे निर्देश सह नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक अधिक्षक, पुणे यांनी दिले आहेत.

सर्व बँका, वित्तीय संस्थांना शासन अधिसूचनेत नमूद केल्यानुसार शेती किंवा पीक कर्जाशी संबंधित संस्थांनी अभिस्वीकृती, रोखपत्र करारनामा, हक्कविलेख निक्षेप, हडप तारण किंवा तारण गहाण, हमीपत्र गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणखत, गहाणाचे सुचनापत्र किंवा घोषणापत्र किंवा यास संलग्न अशा कोणत्याही संलेखावर आकारणी योग्य असलेले दोन लाखांपर्यंतचे मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ करण्यात आले आहे. याबाबत काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश शासन अधिसूचनेद्वारे दिले आहेत.

## उमरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीची कार्यकारिणी जाहीर

**उमरी (प्रतिनिधी)–** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवानिमित्त अनिल सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली उमरी येथे नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

यावेळी निवडण्यात आलेली कार्यकारिणी अशी- अध्यक्ष वसंत सवई, उपाध्यक्ष ए. एस. सोनकांबळे, कार्याध्यक्ष ईश्वर सवई, सचिव उपेंद्र खंदारे, सहसचिव नागेश सोनकांबळे, कोषाध्यक्ष राजेश्वर सवई, संघटक संदीप गोवंदे, कैलास सोनकांबळे, सल्लागार गजानन अडगुडवाड, संदीप लांडगे, अशोक कांबळे व काही सदस्यांची निवड करण्यात आली.

## लाड-पागे नियुक्त्या प्रलंबित : नगरसेवक साहेबराव गायकवाड यांचा तातडीचा पाठपुरावा

### प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा, विलंबाची जबाबदारी निश्चित करा



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महापालिकेमध्ये लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसांना देण्यात येणाऱ्या नोकरीची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणी नगरसेवक साहेबराव गायकवाड यांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे.

महानगरपालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, महानगरपालिकेतील कायमस्वरूपी सफाई कर्मचाऱ्यांच्या निधनानंतर शासन नियमांनुसार त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देणे आवश्यक आहे. लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार आवश्यक कागदपत्रे सादर करूनही अनेक वारसांची नियुक्ती दीर्घकाळ प्रलंबित असून, संबंधित कुटुंबांना आर्थिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासन नियमांनुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर निश्चित कालमर्यादेत नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित असताना संबंधित विभागाकडून होत असलेल्या विलंबाबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रलंबित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढून पात्र वारसांना नियुक्तीपत्र द्यावे तसेच विलंबास कारणीभूत बाबींची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी गायकवाड यांनी केली आहे.

## ६ एप्रिल रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने लोकशाही दिन सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे.

या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषी विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील.

## नांदेड रेल्वे विद्युत विभागाची नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमतेत महत्त्वपूर्ण कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय रेल्वेच्या विद्युत विभागाने फेब्रुवारी २०२६ दरम्यान रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्पांच्या स्थापनेद्वारे आणि ऊर्जा कार्यक्षमतेसंबंधी प्रतिष्ठित प्रमाणपत्रे मिळवून शाश्वत विकास आणि ऊर्जा बचतीच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे.

चालू असलेल्या नवीकरणीय ऊर्जा उपक्रमांतर्गत विविध रेल्वे आस्थापनांवर रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्पांची स्थापना सातत्याने वाढविण्यात येत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जानेवारी २०२६ पर्यंत एकूण २९० kWp क्षमतेचे रूफटॉप सौर प्रकल्प स्थापित करण्यात आले आहेत. यामध्ये विभागीय कार्यालय येथे ३० kWp, IOH/नांदेड येथे १०० kWp, पूर्णा येथे ८० kWp आणि आदिलाबाद येथे ८० kWp क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट असून हे प्रकल्प हरित ऊर्जानिर्मितीत महत्त्वाचे योगदान देत आहेत. या उपक्रमाला अधिक बळकटी देत, फेब्रुवारी २०२६ मध्ये अतिरिक्त ९० kWp क्षमतेचे रूफटॉप सौर प्रकल्प खालील ठिकाणी यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आले आहेतफ

नवीन स्थापित करण्यात आलेल्या ९० ज्ञथ क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांमधून दरवर्षी सुमारे १,३१,४०० युनिट स्वच्छ वीज निर्मिती होण्याची अपेक्षा असून त्यामुळे रेल्वेला दरवर्षी सुमारे१३.१४ लाखांची बचत होणार आहे. आर्थिक बचतीबरोबरच या प्रकल्पांमुळे पर्यावरणीय शाश्वततेलाही मोठे योगदान मिळणार असून दरवर्षी सुमारे १०८ मेट्रिक टन उत्सर्जनात घट होणार आहे.

याशिवाय आणखी एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे जालना येथील कॅरेज अँड वॅगन इमारतीला भारत सरकारच्या ऊर्जा कार्यक्षमता ब्युरोकडून शून्य प्लस प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. हे प्रमाणपत्र अशा इमारतींना दिले जाते ज्या नेट पॉझिटिव्ह एनर्जी दर्जा प्राप्त करतात, म्हणजेच त्या इमारती वर्षभरात स्वतः वापरत असलेल्या ऊर्जेपेक्षा अधिक नवीकरणीय ऊर्जा निर्माण करतात.

## देशातील हळदीच्या उत्पादनात मराठवाड्याचे ४० टक्के योगदान; हळद निर्यातदार पटेल यांची माहिती



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड व इतर जिल्ह्यात हळदीची शेती मोठ्या प्रमाणावर केली जात असल्याने देशातील एकूण हळदीच्या उत्पादनात कच्च्या मालासाठी मराठवाड्याचे ४०% योगदान असल्याची माहिती सांगली येथील उद्योजक तथा हळदीचे निर्यातदार सतीश पटेल यांनी दिली.

नांदेड शहरात औद्योगिक विकास परिषदेच्यावतीने हळद उत्पादक निर्यातदार यांची एक दिवसीय कार्यशाळा येथे घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. सदर औद्योगिक परिषद ही शासनाच्या उद्योग विभागातून निवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांनी औद्योगिक विकासासाठी सामाजिक दृष्टिकोन ठेवून सुरू केली आहे. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून भाऊराव सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा उद्योजक नरेंद्र चव्हाण, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, हरिद्रा केंद्र वसमतचे व्यवस्थापक आर. एम. देशमुख, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक एसबीआयचे डी. जी. सोनकांबळे, अन्न व औषधी प्रशासन विभागाचे निरीक्षक भिसे, कृषी विज्ञान केंद्र पोखरणी येथील शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, ॲक्सिस बँकेचे संगेवार, औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष हर्षद शहा आदींची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पटेल म्हणाले की, हळद उद्योगात टप्प्याटप्प्याने पुढे जाणे महत्त्वाचे ठरते. हळद क्लीनिंग, ग्रेडिंग करून आधी हळकुंड विक्रीस देऊन मगच आपला उद्योग पुढच्या टप्प्यावर घेऊन जावा, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी चव्हाण यांनी उद्योग करताना त्यातील बारकावे लक्षात घेऊन आपला व्यवसाय आपण ए.आय.च्या माध्यमातून जगभर घेऊन जाऊ शकतो, त्यामुळे त्याकडे उद्योजकांनी लक्ष दिले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रास्ताविक प्रवीण देशमुख यांनी केले तर सूत्रसंचालन रतिकांत दस्तापुरे यांनी केले. आभार एस. एन. सोनकांबळे यांनी मानले.

## रामराज्यासाठी अंतर्गत एकजूट आवश्यक; पिंपळगावातील श्रीराम कथेतून प्रबोधन

### हिंदू-शीख एकात्मतेचा संदेश; 'राम' हेच सर्वांचे अधिष्ठान -राधाकृष्ण महाराज



**हदगाव (प्रतिनिधी)–** पिंपळगाव येथे सुरू असलेल्या श्रीराम कथेदरम्यान कथा व्यास राधाकृष्ण महाराज यांनी हिंदू-शीख धर्मातील एकात्मता, श्रीरामांचे सार्वत्रिक महत्त्व आणि समाजातील ऐक्याची गरज यावर प्रभावी विचार मांडत उपस्थित भाविकांना भावनिक व आध्यात्मिक संदेश दिला.

महाराज म्हणाले की, हिंदू धर्म आणि शीख धर्म हे एकमेकांना पुरक व समविचारी धर्म असून, दोन्हींचे मूळ तत्त्व एकच आहे. गुरु गोविंदसिंघजी यांच्या त्यागामुळे धर्मरक्षणाची परंपरा आजही जिवंत आहे, तर गुरु तेग बहाद्दूर आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी धर्मासाठी दिलेल्या बलिदानामुळेच आज धर्म टिकून आहे, असे त्यांनी सांगितले.

हिंदू समाजातील विविध जाती-पंथ एकत्र आले नाहीत, तर 'रामराज्य' स्थापनेचे स्वप्न अपूर्णच राहील, असे स्पष्ट करत त्यांनी समाजातील अंतर्गत ऐक्यावर भर दिला.

इंडोनेशियाचे उदाहरण देत रामाचे वैश्विकत्व अधोरेखित मुस्लीमबहुल इंडोनेशिया देशातही श्रीरामांचे नाव आदराने घेतले जाते. तेथील राष्ट्रीय विमान सेवा गरुडा इंडोनेशिया ही विष्णूच्या वाहनाच्या नावावर आहे. तसेच सांस्कृतिक परंपरांमध्ये रामायणाचा प्रभाव दिसून येतो, असे सांगत महाराजांनी रामाचे सार्वत्रिक अस्तित्त्व अधोरेखित केले.

'राम' म्हणजे त्याग, सेवा आणि प्रेमाचे प्रतीक. श्रीरामांच्या जीवनातील केवट प्रसंगाचे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, गरीब, दुःखी आणि साधू-संतांची सेवा करणाऱ्यांनाच खऱ्या अर्थाने रामाची कृपा लाभते. स्वतः दुःख सहन करून इतरांना सुख देणारे नाव म्हणजे राम, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.


घराघरांत रामायण घडण्याचा संदेश ज्या घरात परस्पर मान-सन्मान, आपुलकी आणि प्रेम असते, तेथेच 'रामायण' घडते, असे सांगत त्यांनी कुटुंबव्यवस्थेतील मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

एकात्मतेतूनच सत्कार्याची निर्मिती, उत्साह, आशीर्वाद आणि परस्पर सहकार्य यामुळेच कोणतेही सत्कार्य घडते, असा सकारात्मक संदेश देत महाराजांनी उपस्थित भाविकांना समाजहितासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.

# अंतर्मन

# चांदीच्या ग्लासात पाणी पिण्याचे फायदे

## चंद्र होणार बलवान, कोणत्या लोकांसाठी आहे फायदेशीर जाणून घ्या...



**वैदिक ज्योतिषशास्त्र तसेच आयुर्वेदात चांदीला विशेष महत्त्व आहे. ज्योतिषशास्त्रानुसार, चांदी पवित्रता, शांती आणि चंद्राशी संबंधित आहे. लाल किताबमध्ये चांदीच्या ग्लासातून पाणी पिणे फायदेशीर मानले गेले आहे. वैदिक ज्योतिष आणि ज्योतिष तज्ञ डॉ. मधू प्रिया प्रसाद यांच्या मते, चांदीच्या ग्लासातून पाणी प्यायल्याने व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा आकर्षित होते. यामुळे मानसिक शांतीही मिळते. जर कुंडलीत चंद्राची स्थिती कमजोर असेल, तर हा उपाय करणे फायदेशीर ठरू शकते. चला, चांदीच्या ग्लासातून पाणी पिण्याचे फायदे सविस्तरपणे जाणून घेऊया...**



चांदी जन्मपत्रिकेतील चंद्राची स्थिती मजबूत करते असे मानले जाते. तिच्या वापरामुळे आंतरिक शांती वाढते आणि नकारात्मक ऊर्जा दूर ठेवण्यासही मदत होते, असे मानले जाते. चांदीच्या ग्लासात पाणी प्यायल्याने भावना संतुलित राहण्यास मदत होते. जर तुम्हाला जास्त चिंता आणि तणावाचा त्रास होत असेल, तर तुम्ही हा उपाय करून पाहू शकता. यामुळे जास्त काळजी आणि तणावापासून आराम मिळू शकतो. चांदीमध्ये सूक्ष्मजीवविरोधी गुणधर्म असल्याचे मानले जाते. चांदीच्या ग्लासात पाणी प्यायल्याने पित्त, कफ आणि वात हे तीन दोष संतुलित होतात. हा धातू चंद्राला बलवान करतो आणि नात्यांमध्ये सखोलता व करुणा वाढवतो. चांदीच्या ग्लासात पाणी प्यायल्याने मनःशांती मिळते आणि सकारात्मक ऊर्जा आकर्षित होते.



### चांदीच्या ग्लासात पाणी पिण्याचे फायदे

ज्योतिषशास्त्रानुसार, चांदीचा संबंध चंद्राशी जोडला जातो, जो मन, मानसिक स्थिती, शांती, भावना आणि आरोग्याशी संबंधित एक घटक आहे. ज्योतिष तज्ञ मधू प्रिया यांच्या मते, जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत चंद्राची स्थिती कमजोर किंवा पीडित असेल, तर त्यांना चंद्र दोषाचा त्रास होऊ शकतो. यामुळे चिंता, भावनिक चढउतार आणि तणाव यांसारख्या समस्या उद्‌भवू शकतात. वैदिक ज्योतिष आणि लाल किताबमध्ये चंद्राला बलवान करण्यासाठी अनेक उपाय सांगितले आहेत. यापैकी एक म्हणजे चांदीच्या भांड्यातून पाणी पिणे.

### चांदीच्या ग्लासात पाणी कसे प्यावे?

- वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार, चांदीच्या ग्लासात पाणी पिण्यासाठी शुद्ध, उच्च-गुणवत्तेच्या चांदीच्या भांड्याचा वापर करावा.
- रात्री चांदीचा ग्लास पूर्णपणे स्वच्छ करा, त्यात स्वच्छ पाणी भरा आणि रात्रभर तसाच ठेवा. यामुळे चांदी आणि चंद्राचे गुणधर्म पाण्यात शोषले जातात.
- पाणी चांदीच्या भांड्यात किमान ६ ते ८ तास ठेवावे. यानंतर, दुसऱ्या दिवशी सकाळी चांदीच्या ग्लासमधून पाणी प्यावे.
- ज्योतिष तज्ञ डॉ. मधू प्रिया यांच्या मते, उत्तम परिणामांसाठी आणि चंद्राची स्थिती मजबूत करण्यासाठी, रिकाम्या पोटी पाणी पिताना ओम सोम सोमाय नमः या मंत्राचा मनातल्या मनात जप करावा.

### चांदीच्या ग्लासमधून पाणी कोणी प्यावे?

- जर चंद्र वृश्चिक राशीत असेल किंवा चंद्र आणि शनीचा संयोग विष योग तयार करत असेल, तर चांदीच्या भांड्यातून पाणी पिणे शुभ मानले जाते.
- असे मानले जाते की कर्क, वृश्चिक आणि मीन राशींसाठी चांदीच्या ग्लासमधून पाणी पिणे अत्यंत फायदेशीर आहे. या तिन्ही राशी जलतत्त्वाच्या आहेत. अशा परिस्थितीत, चांदीच्या भांड्यातून पाणी पिणे शुभ ठरू शकते.
- डॉ. मधु प्रिया आणि आयुर्वेदानुसार, चांदी झोपेच्या समस्या आणि हार्मोनल असंतुलन दूर करण्यास मदत करू शकते. तथापि, हा उपाय वापरण्यापूर्वी, आपल्या कुंडलीतील चंद्राची स्थिती निश्चित करण्यासाठी एका पात्र ज्योतिषाचा सल्ला घ्या.

### चंद्राशी चांदीचा संबंध

ज्योतिषशास्त्रानुसार, चांदीचा संबंध चंद्राशी जोडला जातो, जो मन, मानसिक स्थिती, शांती, भावना आणि आरोग्याशी संबंधित एक घटक आहे. ज्योतिष तज्ञ मधू प्रिया यांच्या मते, जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत चंद्राची स्थिती कमजोर किंवा पीडित असेल, तर त्यांना चंद्र दोषाचा त्रास होऊ शकतो. यामुळे चिंता, भावनिक चढउतार आणि तणाव यांसारख्या समस्या उद्‌भवू शकतात. वैदिक ज्योतिष आणि लाल किताबमध्ये चंद्राला बलवान करण्यासाठी अनेक उपाय सांगितले आहेत. यापैकी एक म्हणजे चांदीच्या भांड्यातून पाणी पिणे.

# बाल्कनी बांधण्यापूर्वी किंवा सजवण्यापूर्वी लक्षात घ्या वास्तू नियम...

## काय करावे अन् काय नाही जाणून घ्या...



**आपण आपल्या घरात बाल्कनी बांधतो. जेणेकरून नैसर्गिक सूर्यप्रकाश आणि सकाळची ताजी हवा आपल्यापर्यंत पोहोचेल. याव्यतिरिक्त, बाल्कनीचे सौंदर्य वाढवण्यासाठी विविध प्रकारची झाडे लावली जातात. तथापि, कधीकधी बांधकाम करताना किंवा तिथे वस्तू ठेवताना झालेल्या चुकांमुळे त्या जागेत वास्तूदोष निर्माण होऊ शकतात. वास्तूशास्त्रानुसार, घरात सुख आणि समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी बाल्कनी बांधताना काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. ती योग्य दिशेत आणि योग्य ठिकाणी बांधणे आवश्यक आहे. चला वास्तूशास्त्रानुसार घरात बाल्कनी कशी असावी हे जाणून घेऊया...**

- बाल्कनी कोणत्या दिशेला असावी? : वास्तुशास्त्रानुसार, बाल्कनी नेहमी उत्तर, पूर्व किंवा ईशान्य दिशेला बांधली पाहिजे. ही दिशा सकारात्मक ऊर्जा आणि सुख-समृद्धीचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे, ईशान्य दिशेला बाल्कनी बांधल्याने घरात सकारात्मक ऊर्जा आकर्षित होते. बाल्कनीचे तोंड उत्तर किंवा पूर्वेकडे असल्यास सुख वाढू शकते. शिवाय, वास्तूनुसार, ही दिशा आरोग्य आणि संपत्ती वाढवणारी देखील मानली जाते.
- या दिशेत बाल्कनी बांधू नका : असे मानले जाते की घराच्या दक्षिण, पश्चिम किंवा नैऋत्य कोपऱ्यात बाल्कनी कधीही बांधू नये. असे केल्याने प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. जर बाल्कनी आधीच नैऋत्य दिशेला असेल, तर ती काचेच्या दारांनी किंवा खिडक्यांनी बंद करावी. अशा प्रकारे बाल्कनी बंद केल्याने वास्तू दोष कमी होऊ शकतात. शिवाय, जर घराचे मुख्य प्रवेशद्वार दक्षिण दिशेला असेल, तर दारासमोर थेट बाल्कनी किंवा व्हरांडा बांधू नये.
- वास्तूनुसार बाल्कनीचे छप्पर : बाल्कनीचे छप्पर बांधताना, ते मुख्य घराच्या इतर छपरांपेक्षा कमी उंचीचे असावे हे लक्षात ठेवा. अशा प्रकारे बाल्कनी बांधणे शुभ मानले जाते. बाल्कनीचे छप्पर किंचित उताराचे असावे. जर ते ईशान्य दिशेला असेल तर ते शुभ मानले जाते. असे मानले जाते की अशा प्रकारच्या बाल्कनीमुळे नैसर्गिक सूर्यप्रकाश कोणत्याही अडथळ्याशिवाय घरात येतो.
- बाल्कनीमध्ये झाडे आणि फर्निचर कसे ठेवावे? : वास्तुशास्त्रानुसार, तुमच्या घरातील बाल्कनी किंवा व्हरांड्यात लहान कुंड्यांमधील रोपे लावावीत. असे मानले जाते की जमिनीवर किंवा भिंतींवर पसरणारी झाडे या ठिकाणी लावू नयेत. असे करणे अशुभ मानले जाते. याव्यतिरिक्त, तुम्ही खूप उंच किंवा जड झाडे लावणे टाळावे. ईशान्य दिशा जलतत्त्वाशी संबंधित आहे. त्यामुळे, तुम्ही येथे लहान सिरॅमिक कुंड्यांमधील रोपे आणि काचेच्या पाण्याच्या बाटल्या ठेवू शकता. जर तुम्ही बाल्कनीमध्ये फर्निचर ठेवण्याचा विचार करत असाल, तर ते दक्षिण किंवा पश्चिम दिशेला ठेवावे. असे मानले जाते की बाल्कनीमध्ये जड वस्तू ठेवणे टाळावे.
- बाल्कनीमध्ये झोपाळा कुठे ठेवावा? : आजकाल बरेच लोक त्यांच्या बाल्कनीमध्ये झोपाळा लावणे पसंत करतात. जर तुम्ही याचा विचार करत असाल, तर दिशेचा विचार नक्की करा. वास्तुशास्त्रानुसार, झोपाळा दक्षिण दिशेला ठेवता येतो. याव्यतिरिक्त, तुम्ही बाल्कनीच्या नैऋत्य कोपऱ्यात खुर्च्या आणि टेबले ठेवू शकता. यामुळे त्यांची दिशा पूर्व आणि उत्तर होईल.

# स्वयंपाकघरासाठी वास्तु टिप्स, जाणून घ्या कोणत्या 5 चुका टाळाव्यात...

**वास्तुशास्त्रानुसार स्वयंपाकघर घराचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जातो. स्वयंपाकघराचा उपयोग केवळ स्वयंपाकासाठीच नाही, तर संपूर्ण घरात ऊर्जेच्या प्रवाहासाठीही होतो. या ऊर्जेचा कुटुंबातील सर्व सदस्यांवर परिणाम होतो. स्वयंपाकघरातून बाहेर पडणाऱ्या ऊर्जेचा आरोग्य आणि संपत्तीवर, तसेच करिअरवर परिणाम होतो. कधीकधी, घरातील ऊर्जेमुळे करिअरच्या प्रगतीत अडथळा येतो. तुमच्या कामातील अडथळे टाळण्यासाठी स्वयंपाकघरात कोणत्या चुका टाळाव्यात, हे वास्तुतज्ज्ञांकडून जाणून घेऊया...**



- अग्नी आणि पाणी एकत्र ठेवू नये : वास्तुतज्ज्ञ सांगतात की, स्वयंपाकघरात पाणी आणि स्टोव्ह एकमेकांसमोर ठेवू नयेत. हा एक मोठा वास्तुदोष आहे. वास्तुशास्त्रानुसार, सिंक आणि स्टोव्हमध्ये किमान २ ते ३ फूट अंतर असावे. जर सिंक आणि स्टोव्ह एकत्र असतील, तर त्यामुळे कुटुंबात कलह आणि मानसिक तणाव निर्माण होऊ शकतो. जर ते जवळ असतील, तर त्यांच्यामध्ये लाकडी किंवा ग्रॅनाइटचा विभाजक लावा.
- स्वयंपाकघरात आरसा लावू नका : स्वयंपाकघराचे सौंदर्य वाढवण्यासाठी घरांमध्ये अनेकदा आरसे लावले जातात, पण अनेकदा स्वयंपाकघरात आरसे लावले जातात. वास्तूनुसार, सजावटीसाठी स्वयंपाकघरात आरसे ठेवण्यास मनाई आहे. वास्तविक पाहता आरसे अग्नीची ऊर्जा परावर्तित करतात आणि जीवनात अस्थिरता निर्माण करतात. यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये अनावश्यक वाद निर्माण होतात.
- तुटलेली भांडी ठेवू नका : चुकीनेसुद्धा स्वयंपाकघरात तडकलेली किंवा फुटलेली भांडी आणि ताटं ठेवू नका. अशी भांडी स्वयंपाकघरात ठेवल्याने गरिबीला आमंत्रण मिळते. कुटुंबात सुख आणि समृद्धी टिकवण्यासाठी, अशी भांडी स्वयंपाकघरातून ताबडतोब काढून टाका.
- घाणेरडी भांडी ठेवू नका : वास्तुशास्त्रानुसार, स्वयंपाकघरातील घाणीमुळे राहूची उपस्थिती वाढते. राहूमुळे कुटुंबात अस्थिरता निर्माण होते. त्यामुळे, रात्री स्वयंपाकघरात घाणेरडी भांडी ठेवणे टाळा. अन्यथा, तुम्हाला आर्थिक अडचणी आणि भार सहन करावा लागेल. रात्री स्वयंपाकघर पूर्णपणे स्वच्छ केल्यावरच झोपा.
- चूल योग्य दिशेला ठेवा : स्वयंपाकघरातील गॅसची चूल योग्य दिशेला, म्हणजेच वायव्य दिशेला ठेवली पाहिजे. असे न केल्यास अग्नी तत्त्व कमजोर होते, ज्यामुळे अनावश्यक खर्च आणि वारंवार व्यावसायिक अडथळे येतात.

# एप्रिल महिन्यात चतुर्ग्रही योग अन् मालव्य राजयोगाचा संयोग!

## मेष, वृषभ राशींसह 5 राशींसाठी हा महिना विशेष लाभदायी...

एप्रिल महिन्यात एक अत्यंत शुभ ग्रहयोग होणार आहे. या महिन्यात मालव्य राजयोगासह चार ग्रहांचा शुभ संयोगही पाहायला मिळेल. या महिन्यात सूर्य, मंगळ, बुध आणि शनी हे ग्रह मीन राशीत प्रवेश करतील. शनी आणि सूर्य आधीपासूनच मीन राशीत आहेत. शुक्र ग्रहदेखील या महिन्यात स्वतःच्या वृषभ राशीत गोचर (गोचर म्हणजे ग्रहांचे एका राशीतून दुसऱ्या राशीत होणारे सततचे भ्रमण किंवा संक्रमण.) करेल. शुक्राच्या स्वतःच्या वृषभ राशीतील गोचरामुळे मालव्य राजयोग निर्माण होईल. ज्योतिषशास्त्रानुसार मालव्य राजयोग हा एक प्रभावशाली आणि शक्तिशाली राजयोग मानला जातो. ज्योतिषी सचिन मल्होत्रा यांच्या गणनेनुसार, एप्रिलमधील हा ग्रहयोग मेष आणि वृषभ राशीसह पाच राशींना महत्त्वपूर्ण लाभ मिळवून देईल. करिअरमधील प्रगतीसोबतच कौटुंबिक जीवनातही आनंद मिळेल. चला जाणून घेऊया की एप्रिलमधील ग्रहांच्या गोचरामुळे कोणत्या राशींना लाभ होईल...



- मेष राशीच्या लोकांचा कार्यस्थळी अधिकार वाढेल : एप्रिल महिना मेष राशीसाठी चांगला असणार आहे. सध्या शनीची साडेसाती सुरू आहे आणि राशीचा स्वामी असलेल्या मंगळाची स्थिती देखील प्रतिकूल दिसत आहे. मात्र, या महिन्याच्या उत्तरार्धात सूर्य मेष राशीत गोचर करेल. येथे सूर्य उच्च राशीत आणि अत्यंत बलवान स्थितीत असेल. महिन्याचा उत्तरार्ध सर्वांसाठी विशेषतः अनुकूल असेल. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांशी समन्वय वाढेल. जे नोकरी बदलण्याचा विचार करत आहेत, त्यांची इच्छा पूर्ण होऊ शकते. सरकारी कामे पूर्ण होण्याचीही चांगली शक्यता आहे. तथापि, तुम्हाला तुमच्या कौटुंबिक जीवनाकडे थोडे लक्ष देण्याची गरज आहे.
- वृषभ राशीसाठी महिना अत्यंत फायदेशीर : एप्रिल महिना वृषभ राशीच्या लोकांसाठी खूप फायदेशीर ठरू शकतो. महिन्याच्या सुरुवातीला गुरु वृषभ राशीच्या दुसऱ्या घरात असेल. तर शुक्राचा स्वराशीतील गोचर महिन्याचा उत्तरार्ध तुमच्यासाठी अधिक चांगला बनवेल. कौटुंबिक जीवन तुमच्या करिअरमध्ये सकारात्मक परिणाम आणू शकते. याव्यतिरिक्त, तुम्ही चैनीच्या वस्तूंवर चांगला खर्च करू शकता. नोकरी करणाऱ्यांना महिला सहकाऱ्याकडून फायदा होण्याची शक्यता आहे.
- सिंह राशीचा मान वाढेल : एप्रिल महिना सिंह राशीच्या लोकांसाठी संमिश्र स्वरूपाचा असेल. महिन्याच्या सुरुवातीला तुम्हाला काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. नंतर तुमचा प्रभाव आणि प्रतिष्ठा वाढेल. तुमच्या राशीवर सूर्याचा योग असल्याने तुम्हाला शासकीय क्षेत्रात लाभ मिळेल. राजकारणात गुंतलेल्यांसाठी हा काळ विशेषतः फायदेशीर ठरेल. मात्र, आपल्या आरोग्याची काळजी घ्या.
- तूळ राशी शुभ प्रसंगांवर खर्च होण्याची शक्यता : तूळ राशीच्या लोकांना त्यांच्या करिअरमध्ये लक्षणीय प्रगतीची संधी मिळेल. तुम्ही ज्या पदोन्नतीची वाट पाहत आहात, ती तुम्हाला सहज मिळेल. तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडूनही पूर्ण पाठिंबा मिळेल. तुम्ही एखाद्या शुभ प्रसंगावर खर्च करू शकता. तथापि, महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक समस्या वाढू शकतात.
- धनु राशीच्या व्यक्ती शुभ घटनांमध्ये सहभागी : एप्रिल महिना धनु राशीच्या लोकांसाठी खूप चांगला ठरेल. या संपूर्ण महिन्यात तुमच्या राशीचा स्वामी असलेल्या गुरूचा प्रभाव तुमच्यावर राहील. हे तुमच्यासाठी खूप अनुकूल ठरेल. कुटुंबात शुभ घटना घडू शकतात. तुम्हाला प्रभावशाली लोकांना भेटण्याची संधी मिळेल. त्यांच्याशी संवाद वाढवणे खूप फायदेशीर ठरू शकते. कौटुंबिक जीवन तुमच्यासाठी चांगले असेल. तुम्हाला धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी देखील मिळेल.

# भारताच्या मदतीला धावून आली अर्जेंटिना; २० हजार किमी दूरून भारताला एलपीजी पुरवणार



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पश्चिम आशियात सुरू असलेल्या इराण-इस्रायल-अमेरिका युद्धामुळे आणि होर्मुज सामुद्रधुनी बंद झाल्याने भारतात एलपीजीचा तुटवडा गंभीर झाला होता. अशा कठीण काळात तब्बल २० हजार किमी दूर असलेला दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना भारताच्या मदतीसाठी धावून आला आहे. या संकटात अर्जेंटिनाने भारताला एलपीजी पुरवण्याची तयारी दर्शवली आहे.

भारतामधील अर्जेंटिनाचे राजदूत मारियानो अगस्टिन कौसेनो यांनी सांगितले की, भारताच्या ऊर्जा सुरक्षेत मोठी भूमिका बजावण्यासाठी त्यांचा देश पूर्णपणे तयार आहे. त्यांनी भारताच्या 'ऊर्जा विविधीकरण' धोरणाचे कौतुक करत अर्जेंटिनाकडे नैसर्गिक वायूचे मोठे साठे उपलब्ध असल्याचे नमूद केले. अर्जेंटिनाच्या राष्ट्रीय गॅस आणि तेल कंपनीचे प्रमुख मागील वर्षी दोनदा भारत दौऱ्यावर आले होते. त्यांनी केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी तसेच भारतीय ऊर्जा कंपन्यांच्या प्रतिनिधींशी बैठक घेतली होती. अर्जेंटिनाने २०२६ च्या पहिल्या तिमाहीत भारताला ५०,००० टन एलपीजीचा पुरवठा केला, जो संपूर्ण २०२५ वर्षात पाठवलेल्या २२ हजार टनांच्या दुप्पटाहून अधिक आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वीच बहिया ब्लांका बंदरातून ३९ हजार टन एलपीजी भारतात पोहोचले होते. संकटाच्या काळात ५ मार्च रोजी आणखी ११ हजार टनांचा एक शिपमेंट पाठवण्यात आला. भारताच्या सुमारे ६०% एलपीजी आयात होर्मुज सामुद्रधुनीमार्गे होते. युद्धामुळे हा मार्ग प्रभावित झाल्याने पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला. या संकटावर मात करण्यासाठी भारत सरकारने देशांतर्गत स्तरावरही उपाययोजना केल्या. हॉटेल आणि खाद्यव्यवसायांसाठी कमर्शियल एलपीजी कोटा २०% ने वाढवण्यात आला. तसेच पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) कनेक्शन जलद गतीने देण्यास सुरुवात करण्यात आली. ऊर्जा सुरक्षिततेसाठी भारत सरकारने जगातील ४० हून अधिक देशांशी संपर्क वाढवला आहे. अर्जेंटिनासोबतची ही भागीदारी तुलनेने नवी आहे. २०२४ पूर्वी अर्जेंटिना भारताला एलपीजी पुरवत नव्हता; मात्र युद्धामुळे हे संबंध वेगाने मजबूत होत आहेत. जरी २०,००० किमी दूरून माल आणताना वेळ आणि खर्च जास्त लागतो तसेच हवामानाचा परिणाम होण्याची शक्यता असते, तरीही हा पुरवठा भारतासाठी मोठा दिलासा ठरत आहे.

दरम्यान, इराणने अलीकडेच भारतासह काही मैत्रीपूर्ण देशांच्या जहाजांसाठी होर्मुज सामुद्रधुनी खुली करण्याची घोषणा केली असून त्यामुळे पुढील काळात पुरवठा सुधारण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी चर्चा करून होर्मुज मार्ग सुरक्षित ठेवण्याचे आवाहन केले होते. भारत सरकार ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने सर्व आवश्यक पावले उचलत आहे.

शेतरस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या किंवा रस्त्याचे नुकसान करणाऱ्यांचे

# आधार कार्ड आणि फार्मर आयडी ५ वर्षांसाठी ब्लॉक



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीमालाची वाहतूक सुलभ करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना संदर्भात महसूल व वन विभागामार्फत महत्त्वपूर्ण शासन शुद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यापूर्वी दिनांक १४ डिसेंबर २०२५, ०७ जानेवारी २०२६ आणि १८ फेब्रुवारी २०२६ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयांमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या असून शेतरस्ते अडवणाऱ्यांना थेट ५ वर्षे सरकारी योजनांसाठी अपात्र करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे

मुख्यमंत्री बळीराजा शेत आणि पाणंद रस्ते योजनेत महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या असून शेतरस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या किंवा रस्त्याचे नुकसान करणाऱ्यांचे आधार कार्ड आणि फार्मर आयडी तब्बल ५ वर्षांसाठी ब्लॉक करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरुन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून यासंदर्भातील शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे. त्यामुळे, शेतरस्ते अडवणाऱ्या किंवा वाद घालणाऱ्यांना आता काळजी घ्यावी लागेल. पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण ७ दिवसांत हटविण्याचे आदेश देण्यात येतील. अतिक्रमण न काढल्यास प्रशासनाकडून ते हटविले जाईल. तसेच, इतर शेतकऱ्यांच्या ये-जा हक्काच्या रस्त्यावर शेती करता येणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे आधार व फार्मर आयडी ५ वर्षांसाठी ब्लॉक करण्यात येतील आणि शासनाच्या योजनांपासून अपात्र ठरविण्यात येईल. या योजनेसाठी कोणतेही भूसंपादन केले जाणार नाही. शेतकरी स्वेच्छेने जमीन देऊ शकतात, परंतु त्यासाठी नोंदणीकृत दानपत्र/हक्कसोड आवश्यक राहील. दिलेली जमीन परत मागण्याचा हक्क राहणार नाही. या नोंदणीसाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क माफ करण्यात आले आहे. विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये ५ शेतकऱ्यांची निवड करण्याचे अधिकार संबंधित आमदारांना देण्यात आले आहेत.

कंत्राटदारांची निवड पारदर्शक पद्धतीने करून पात्र कंत्राटदारांचे पॅनेल तयार केले जाईल. एकापेक्षा अधिक कंत्राटदारांना समान प्रमाणात काम वाटप करता येईल. कामाच्या रकमेच्या २% किंवा किमान रु.१५ लाख इतकी सुरक्षा ठेव अनिवार्य राहील. कंत्राटदाराकडे आवश्यक यंत्रसामग्री स्वतःच्या मालकीची असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# डबेवाल्यांना लवकरच १०५ ई बाईक्स; महापौर रितू तावडे यांनी केली घोषणा




**मुंबई (प्रतिनिधी)** –मुंबईत प्रस्तावित प्रवेशद्वारांपैकी एक प्रवेशद्वार डबेवाला संकल्पनेवर आधारित उभारण्याचा मानस व्यक्त करत मुंबई महापौर रितू तावडे यांनी डबेवाल्यांसाठी लवकरच १०५ ई-बाइक्स उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा केली. पूर्वीच्या तुलनेत डबेवाल्यांची संख्या काहीशी कमी झाली असली तरी या सेवेचा गौरव आणि प्रतिष्ठा आजही तितकीच उंचावलेली आहे. व्यवस्था केवळ जेवण पोहोचवण्यापुरती मर्यादित नसून उत्कृष्ट व्यवस्थापन आणि सेवा संस्कृतीचे जिवंत उदाहरण आहे. डबेवाले हे खऱ्या अर्थाने मुंबईच्या कार्यसंस्कृतीचे राजदूत आहेत असेही गौरवोद्गार महापौरांनी मुंबई डबेवाला आंतरराष्ट्रीय अनुभव केंद्राच्या पाहणी प्रसंगी काढले.

महापौर रितू तावडे यांनी वांद्रे (पश्चिम) येथील रिझवी महाविद्यालय परिसरातील 'मुंबई डबेवाला आंतरराष्ट्रीय अनुभव केंद्र' ला काल मंगळवारी २५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्रातील विविध विभागांची पाहणी केली तसेच डबेवाल्यांशी संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. डबेवाला केंद्र भेटीप्रसंगी नगरसेविका स्वप्नाली म्हात्रे, नगरसेविका सायली कुलकर्णी, मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर असोसिएशनचे अध्यक्ष रामदास करवंदे, सचिव किरण गवांदे, नूतन मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष उल्हास मुके, सचिव विनोद शेट्टी, तसेच अनुभव केंद्राचे सुबोध सांगळे आणि डबेवाला संघटनेचे इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी महापौरांनी महापौरांनी डबेवाल्यांच्या दैनंदिन कामकाजातील 'सॉर्टिंग' (वर्गीकरण), 'कोडिंग' आणि वितरण प्रक्रियेची सविस्तर माहिती घेतली. अत्यंत गुंतागुंतीची ही प्रक्रिया अत्यल्प त्रुटींनी पार पाडत लाखो डबे वेळेत पोहोचवण्याच्या त्यांच्या कौशल्याचे त्यांनी कौतुक केले. मुंबई डबेवाला आंतरराष्ट्रीय अनुभव केंद्र हे डबेवाल्यांच्या ऐतिहासिक परंपरेचे जतन व प्रसार करणारे महत्त्वाचे ठिकाण आहे. येथे डबे वर्गीकरण, कोडिंग आणि वितरण प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो. डिजिटल आणि इंटरॅक्टिव्ह माध्यमांतून या सेवेचा इतिहास व परंपरा अभ्यागतांना समजावून सांगितली जाते. त्याची पाहणी महापौर तावडे यांनी केली.

केंद्रातील 'वारसा प्रदर्शन' आणि 'व्ही आर झोन' द्वारे डबेवाल्यांचा प्रवास प्रभावीपणे सादर केला जातो. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'डबेवाला' स्वरूपातील स्वतःचे छायाचित्र पाहण्याची सुविधा देखील येथे उपलब्ध असून, महापौरांनी त्याचाही अनुभव घेतला.सुमारे १३५ वर्षांहून अधिक काळ अखंडपणे सुरू असलेली डबेवाल्यांची सेवा ही कौतुकाच्या पलीकडची आहे. संपूर्ण मुंबईत दुपारी ठराविक वेळेत जेवणाचे डबे पोहोचवण्याची ही व्यवस्था लाखो नागरिकांच्या जीवनाशी निगडित आहे.

# जालन्यात इंधन वितरणावर निर्बंध; पोलीस बंदोबस्तात पेट्रोल-डिझेल वाटप



**जालना (प्रतिनिधी)** – जालना शहरात पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. साठा कमी पडत असल्यामुळे शहरातील अनेक पेट्रोल पंप बंद ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, चौधरी नगर भागातील एका पेट्रोल पंपावर मोठी गर्दी उसळल्याने तेथे पोलीस बंदोबस्तात पेट्रोल-डिझेलचे वितरण सुरू करण्यात आले आहे.

जालना जिल्हा पुरवठा विभागाने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी काही निर्बंध लागू केले आहेत. दुचाकी वाहनांसाठी दोनशे रुपयांपर्यंत तर तीन आणि चारचाकी वाहनांसाठी सातशे रुपयांपर्यंत पेट्रोल-डिझेल देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच कॅन आणि बाटल्यांमध्ये इंधन देण्यासही बंदी घालण्यात आली आहे.सध्याच्या परिस्थितीवर बोलताना पंप व्यवस्थापकांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रत्येकाला पेट्रोल आणि डिझेल मिळणार आहे. मात्र अनावश्यक गर्दीमुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळेच पोलिसांना पाचारण करावे लागत आहे. शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसारच इंधन वाटप केले जाईल, त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे. दरम्यान, शेतकऱ्यांनीही प्रशासनाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे. सध्या पिकांच्या काढणीचा हंगाम सुरू असताना ट्रॅक्टरसाठी डिझेलची मोठी गरज आहे. मात्र डिझेल उपलब्ध होत नसल्याने शेतीची कामे अडचणीत आली आहेत. जिल्हा पुरवठा विभागाच्या निर्बंधांमुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. ट्रॅक्टर थेट शेतातून पेट्रोल पंपावर आणायचा का आणि केवळ दोनशे रुपयांचे डिझेल भरून परत न्यायचा का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली आहे.

रामेश्वर सोळुंके, पंप व्यवस्थापक म्हणाले की, शासनाने घालून दिलेल्या नियमांनुसारच आम्ही पेट्रोल आणि डिझेल देत आहोत. प्रत्येकाला इंधन मिळणार आहे, त्यामुळे नागरिकांनी घाबरून गर्दी करू नये. अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे. शेतकरी म्हणाले की, सध्या शेतीच्या कामासाठी डिझेलची खूप गरज आहे. मात्र निर्बंधांमुळे आम्हाला पुरेसे डिझेल मिळत नाही. अशा परिस्थितीत शेतीची कामे कशी करायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी.

# १६ वर्षीय मुलीवर कोयत्याने जीवघेणा हल्ला; आरोपी अटकेत

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुलुंड परिसरात घडलेल्या धक्कादायक घटनेने मुंबईत खळबळ उडाली आहे. केवळ बोलणं बंद केल्याच्या रागातून एका तरुणाने १६ वर्षीय मुलीवर कोयत्याने हल्ला केल्याची भीषण घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात मुलगी गंभीर जखमी झाली असून तिच्यासोबत असलेल्या मित्रालाही मारहाण करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आशिष बनसोड आणि पीडित मुलगी दोघेही बदलापूर येथील रहिवासी असून एकमेकांना ओळखत होते. काही वैयक्तिक कारणांमुळे मुलीने त्याच्याशी संवाद बंद केला होता. याच संतापातून आरोपीने मुलुंडमधील तिच्या कॉलेजजवळ तिला गाठत सोबत आणलेल्या कोयत्याने तिच्या गळ्यावर वार केला. यावेळी तिच्यासोबत असलेल्या मित्रालाही त्याने गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर आरोपीने दोघांनाही जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी मुलुंड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला शस्त्रासह अटक केली आहे. आरोपीवर यापूर्वीही बदलापूरमध्ये विविध गुन्हे दाखल असल्याची माहितीलरवश्रर्री समोर आली आहे. सध्या पोलीस अधिक तपास करत आहेत.

दरम्यान, या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. केवळ बोलण्यास नकार दिल्यामुळे एवढ्या टोकाचा हल्ला होणे ही अत्यंत चिंताजनक बाब असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर अधिक कडक उपाययोजना आणि समाजात जागरूकता वाढवण्याची गरज व्यक्त होत आहे.

# फडणवीस यांचा पेट्रोल-डिझेलच्या काळाबाजारावर कारवाईचा इशारा




नागपूर : राज्यात पेट्रोल पंपांवर अचानक वाढलेल्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल 'लॉकडाऊन' लागू होणार असल्याच्या अफवा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरत आहेत. मात्र, या सर्व अफवांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठामपणे फेटाळून लावत राज्यात कुठल्याही प्रकारची इंधनटंचाई नसल्याचे स्पष्ट केले आहे. नागरिकांनी घाबरून जाऊन पेट्रोल-डिझेलची पॅनिक बाईंग करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. केंद्र सरकारने सांगितले आहे की, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. दर महिन्याला जितके पेट्रोल डिझेल आवश्यक असते, तितका पुरवठा सरकारकडे नियमितपणे उपलब्ध असतो. केंद्र सरकारकडूनही वारंवार इंधनसाठा पुरेसा असल्याची माहिती देण्यात येत असतानाही काही ठिकाणी नागरिकांनी अनावश्यक गर्दी करून जास्तीचे पेट्रोल भरून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या 'पॅनिक बायिंग' मुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता वाढते, असे मुख्यमंत्र्यांनी केले.

अचानक वाढलेल्या मागणीमुळे पुरवठा व्यवस्थेवर ताण येतो आणि त्यामुळे काही ठिकाणी अडचणी निर्माण होतात. मात्र, प्रत्यक्षात पेट्रोल-डिझेलची कमतरता नसताना लोकांनी पेट्रोल पंपांवर रांगा लावणे ही चुकीची प्रवृत्ती आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगावा आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेट्रोल-डिझेलचा काळाबाजारा बाबतही इशारा दिला. जर कुठे पेट्रोल किंवा डिझेलचा काळाबाजार होत असल्याचे आढळले, तर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासन अशा प्रकारांवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# अफगाण-पाकमध्ये पुन्हा चकमक, ३ जणांचा मृत्यू

**काबुल/इस्लामाबाद** – अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या सीमेवर बुधवारी पुन्हा लढाई सुरू झाली. अफगाण तालिबान अधिकाऱ्यांच्या मते, या हल्ल्यात किमान दोन सामान्य नागरिक ठार झाले आणि ८ जण जखमी झाले. तर पाकिस्तानातही एका नागरिकाच्या मृत्यूची बातमी आहे.

अफगाणिस्तान आणि पाकिस्तानने एकत्र येऊन ईदनिमित्त ५ दिवसांची तात्पुरती युद्धबंदी जाहीर केली होती. २५ मार्च रोजी युद्धबंदी संपल्यानंतर दोन्ही देशांमध्ये पुन्हा चकमकी सुरू झाल्या आहेत.

न्यूज एजन्सी झ नुसार, एका अफगाण अधिकाऱ्याने सांगितले की, युद्धबंदी संपताच पाकिस्तानी सैन्याने नरई आणि सरकानो भागात डझनभर तोफगोळे डागले. त्यांनी सांगितले की, प्रत्युत्तरादाखल अफगाण सीमा दलांनीही गोळीबार केला आणि तीन पाकिस्तानी लष्करी चौक्या उद्ध्वस्त केल्या, तसेच १ व्यक्तीला ठार केले. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यात १७ मार्च रोजी हिंसक चकमक झाली होती. यानंतर पाकिस्तानी हवाई दलाने काबुलच्या अनेक भागांवर क्षेपणास्त्र हल्ले केले होते. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यात १७ मार्च रोजी हिंसक चकमक झाली होती. यानंतर पाकिस्तानी हवाई दलाने काबुलच्या अनेक भागांवर क्षेपणास्त्र हल्ले केले होते. ही हिंसा त्या करारानंतर सुमारे एका आठवड्याने झाली आहे, ज्यात दोन्ही देशांनी लढाई थांबवण्यावर सहमती दर्शवली होती. हा करार सौदी अरेबिया, तुर्कस्तान आणि कतारच्या सांगण्यावरून झाला होता. यापूर्वी पाकिस्तानने १७ मार्चच्या रात्री अफगाणिस्तानमध्ये हवाई हल्ले केले होते.

अफगाण तालिबान सरकारचा दावा आहे की या हल्ल्यांमध्ये काबुलमधील एका व्यसनमुक्ती रुग्णालयाला लक्ष्य करण्यात आले, ज्यात ४०० हून अधिक लोक मारले गेले होते. तथापि, पाकिस्तानने नागरिकांना लक्ष्य केल्याचा इन्कार केला आहे आणि म्हटले आहे की त्याने दारुगोळ्याच्या एका गोदामावर हल्ला केला होता. मीडिया आणि संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात व्यसनमुक्ती केंद्रावरील हल्ल्याची बाब समोर आली, परंतु पाकिस्तानच्या सैन्याने कोणत्याही नागरिकाच्या मृत्यूची बाब स्वीकारली नाही. याऐवजी, पाकिस्तानचे लष्करी प्रवक्ते अहमद शरीफ चौधरी यांनी आरोप केला की तालिबान व्यसनाधीन लोकांना आत्मघाती हल्ल्यांसाठी वापरतो. तथापि, त्यांनी त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ कोणताही पुरावा दिला नाही.

# सोन्या-चांदीच्या दरात दहा हजारांची घसरण



**मुंबई (प्रतिनिधी)** – इराण-इस्त्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक बाजारपेठेत मोठे चढउतार सुरू असून त्याचा थेट परिणाम सोनं आणि चांदीच्या दरावर होताना दिसत आहे. गुरुवारी दोन्ही मौल्यवान धातूंमध्ये मोठी घसरण नोंदवण्यात आली.

गुरुवारी सोन्याचा दर १,४३,००० रुपयांवर आला असून तो बुधवारच्या तुलनेत सुमारे २ हजार रुपयांनी घसरला आहे. तर चांदीचा दर २,३०,००० रुपयांवर पोहोचला असून त्यात तब्बल १० हजार रुपयांची घसरण झाली आहे. हे दर जीएसटी वगळून असल्याची माहिती बाजारातून मिळाली आहे. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीमुळे सोनं-चांदीच्या किमतीत मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाच दिवसांच्या युद्धविरामची घोषणा केल्याने काही काळ परिस्थिती सुधारण्याची चिन्हं दिसत होती. मात्र इराणने ट्रम्प यांचं वक्तव्य फेटाळल्यामुळे पुन्हा एकदा बाजारात अनिश्चितता वाढली आहे.

डोनाल्ड ट्रम्प आणि इराणमधील शाब्दिक चकमकीमुळे गुंतवणूकदार संभ्रमात असून त्याचा परिणाम थेट सोनं आणि चांदीच्या दरावर होताना दिसत आहे. जागतिक स्तरावर मागणी आणि पुरवठा यामध्ये तफावत निर्माण झाल्याने दरात मोठे चढउतार होत आहेत. सुवर्ण व्यावसायिकांच्या मते, जर युद्धविराम पूर्णपणे लागू झाला तर सोन्याचे दर पुन्हा स्थिर होऊ शकतात. मात्र संघर्ष पुन्हा वाढला, तर सोनं आणि चांदी आणखी स्वस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गुंतवणूकदारांनी सध्या सावध भूमिका घेण्याची गरज असल्याचं तज्ज्ञांचे मत आहे.

# कुवैत इंटरनॅशनल विमानतळावर ड्रोन हल्ला




**कुवैत** – आखाती देशाच्या उड्डाण मंत्रालयाने बुधवारी (२५ मार्च) दिलेल्या माहितीनुसार कुवेत इंटरनॅशनल विमानतळावर ड्रोनद्वारे हल्ला करण्यात आला. यावेळी इंधन टाकीला आग लागली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

प्राथमिक माहितीनुसार, नागरी उड्डाण महासंचालनालयाने ऑनलाइन जारी केलेल्या निवेदनात सांगितले की या हल्ल्यात फक्त मर्यादित नुकसान झाले आहे. प्रवक्ते अब्दुल्ला अल-राजही यांनी सांगितले की संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ आपत्कालीन प्रक्रिया लागू केल्या आणि आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाला तैनात करण्यात आले. इराण अमेरिका इस्त्रायल यांच्यात युद्ध सुरु झाल्यापासून कुवैत विमानतळावर अनेक वेळा हल्ले झाले आहेत. १४ मार्च रोजी नागरी उड्डाण प्राधिकरणाने सांगितले होते की अनेक ड्रोनद्वारे करण्यात आलेल्या हल्ल्यात विमानतळाला लक्ष्य करण्यात आले आणि त्याच्या रडार प्रणालीवरही हल्ला झाला. त्या घटनेतही कोणतीही जीवितहानी झाली नव्हती. यापूर्वी ८ मार्च रोजी ड्रोनने विमानतळावरील इंधन टाक्यांना लक्ष्य केले होते. तसेच त्याआधी प्रवासी टर्मिनलवर झालेल्या एका हल्ल्यात काही लोक किरकोळ जखमी झाले होते आणि काही प्रमाणात नुकसानही झाले होते.


**Change In Name**

My Old Name is **Sujit Digambar Lone** which now I am changing as New Name **Sujit Digambar Yeolikar.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - 211, C-Wing, Pharande Nagar Park, Wadi Bk. Nanded**

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




## ‘गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार’ योजनेअंतर्गत पार्डी-निमगाव येथील कामाचा जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या हस्ते शुभारंभ



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील पार्डी (म.) – निमगाव शिवारात असलेल्या सिंचन तलावातील व नदीतील गाळ काढून ती गाळमुक्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. भविष्यात या परिसरातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन आणि नाम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार योजनेअंतर्गत या जलसंधारण कामास सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी लोकप्रतिनिधी, गावकरी व संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या योजनेअंतर्गत धरण, तलाव व नदीपात्रात साचलेला गाळ काढून जलसाठवण क्षमता वाढविण्याचा उद्देश आहे. गाळ काढल्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होणार असून, परिसरातील शेती, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणा होणार आहे. हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार असून, आगामी काळात या भागातील पाण्याची टंचाई दूर होण्यास मदत होईल. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, मंडळ अधिकारी नवीन रेड्डी, कृषी बाजार समितीचे संचालक निळकंठराव मदने, सरपंच शोभाबाई कांबळे, आशिष खडसे उपविभागीय अभियंता,जलसंधारन अधिकारी अक्षय सोलसे, तलाठी लक्ष्मण देशमुख, दयासागर गायकवाड, नाम फाऊंडेशनचे गणेश गायकवाड, उमेश पाटील, माजी सरपंच मारोतराव देशमुख, ग्रामसेवक शिवकुमार देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले की, नदीतील गाळ काढण्याची संकल्पना यशस्वी करू, शेतकऱ्यांना सिंचनासाठी व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटतो, बहुउपयोगी हे काम आहे, असे सागून त्यांनी नाम फाऊंडेशनचे कौतुक केले.

यावेळी हनुमंत देशमुख, प्रसाद हापगुंडे, गोविंद देशमुख, नंदकुमार देशमुख, विठ्ठल देबगुंडे, शंकर हापगुंडे, सुनिलअप्पा मरकुंदे, पोलीस पाटील किरण भांगे, महेश देशमुख, काशीनाथ हापगुंडे, देवीदास कांबळे, साहेबराव हापगुंडे, रवी पत्रे, शिवशंकर दहिभाते यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

## नांदेडमध्ये दामिनी पथकाकडून २७० जणांवर कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील शाळा, कॉलेज, सार्वजनिक ठिकाण, उद्यान अशा विविध ठिकाणी दामिनी पथक गस्त घालत आहे. मुली, महिलांची छेड काढणे, त्यांना त्रास देणे असे प्रकार करणाऱ्या रोडरोमियो, टुकार तरुणांविरोधात कारवाई करते. दामिनी पथकाने तीन महिन्यात जवळपास २७० जणांवर कारवाई केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून शाळा, कॉलेज, कोचिंग क्लासेस परिसरात मुलींची व महिलांची छेड काढण्याचे प्रकार वाढल्याने दामिनी पथकाने अधिक सतर्क राहून छेडछाड करुन महिला, तरुणींना त्रास देणाऱ्या व शहरातील शांतता भंग करणाऱ्या टुकार व रोडरोमियोंना चांगलाच हिसका दाखविला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने महाराष्ट्र पोलीस कायद्याअंतर्गत २५१ जणांवर कारवाई केली तर १९ जणांवर मोटार वाहन कायद्या अंतर्गत कारवाई केली. पथकाने एकूण २७० जणांवर कारवाई केली.

## पिस्तुलधारी युवकास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात कमरेला पिस्तूल लावून वेळप्रसंगी धमक्या देऊन दहशत पसरणाऱ्या एका गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. त्याच्याकडून एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस जप्त केले आहे.

बुधवार, दि. २५ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांची टीम नांदेड शहरात गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग करीत असताना त्यांना खबऱ्याकडून माहिती मिळाली की, दोन इसम अवैध पिस्तुल व खंजर बाळगुन विमानतळ ते शिवमंदिर जाणारे रोडवरील आसरानगर, नांदेड येथील पाटीजवळील रोडवर विक्री करण्याचे उद्देशाने थांबलेले आहेत. या माहितीवरुन नमूद ठिकाणी जावून सय्यद शाहेद ऊर्फ पटेल सय्यद दस्तगीर (वय २२ रा. रहिमपूर, वसरणी ता.जि. नांदेड), दीपक ऊर्फ छक्या विनोद भोकरे (वय २६ वर्ष व्यवसाय बेकार रा. कोठा नांदेड) असे सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता सय्यद शाहेद ऊर्फ पटेल सय्यद दस्तगीर याच्या कमरेला डाव्या बाजूस पँटमध्ये खोसलेली एक गावठी पिस्टल (अग्निशत्र) मॅग्झीनसह दोन जिवंत पितळी काडतुस तसेच दीपक ऊर्फ छक्या विनोद भोकरे याच्या अंगझडतीमध्ये एक लोखंडी खंजर मिळून आला. तेव्हा त्यांना सदरचे गावठी पिस्तूल, जिवंत काडतूस व खंजर कोणाकडून खरेदी केले याबाबत विचारले असता त्यांनी निखिल ऊर्फ चिंट्या घोरपडे रा. वसरणी याच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले.



डॉ. व्यंकटेश काब्दे यांचा राजीनामा मंजूर करू नका

## महाविद्यालयाबाहेर आज विद्यार्थी संघटनांचे ‘सत्याग्रह आंदोलन’

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून, संस्था तो स्वीकारण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. हा निर्णय विद्यार्थी आणि संस्थेच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत क्लेशदायक असल्याचे सांगत, या राजीनाम्याविरोधात विद्यार्थी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. हा राजीनामा मंजूर करू नये, या मागणीसाठी शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर एसएफआय, डीवायएफआय, एएसएफआय, विद्यार्थी युवक कृती समितीच्यावतीने ‘सत्याग्रह आंदोलन’ करण्यात येणार असल्याचे निवेदन भाग्यनगर पोलिसांना देण्यात आले आहे.



नांदेड एज्युकेशन सोसायटी ही स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेली संस्था आहे. गोविंदभाई श्रॉफ, नरहर कुरुंदकर, भाई सदाशिवराव पाटील, डॉ. सुरेंद्र बारलिंगे आणि दत्ता भगत यांसारख्या महान व्यक्तींचा वारसा या संस्थेला लाभलेला आहे. डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी या परंपरेचा सन्मान राखत संस्थेच्या सामाजिक बांधीलकीला अधिक दृढ केले आहे. सध्याच्या काळात संस्थेला त्यांच्यासारख्या अनुभवी आणि विचारशील नेतृत्वाची नितांत गरज असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

विद्यार्थी संघटनांच्या मते, संस्थेतील काही चुकीच्या घडामोडींमुळे व्यथित होऊन डॉ. काब्दे यांनी हा टोकाचा निर्णय घेतला आहे. ते केवळ संस्थेचे अध्यक्ष नसून नांदेड जिल्ह्यातील सामान्य आणि गोरगरीब जनतेचे खंबीर नेतृत्व आहेत. त्यांच्या राजीनाम्यामुळे संस्थेची शैक्षणिक शिस्त आणि विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २७ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सायन्स कॉलेज व पीपल्स कॉलेजकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर एसएफआय, डीवायएफआय,एएसएफआय, विद्यार्थी युवक कृती समितीच्यावतीने सत्याग्रह आंदोलन करण्यात येणार आहे.

पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि पारदर्शक कारभारासाठी डॉ. काब्दे यांचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाऊ नये, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

## रामतीर्थ येथे श्रीराम नवमीनिमित्त आज कुस्त्यांचा फड

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – पंचक्रोशीतील प्रसिद्ध असलेल्या रामकुंड येथे रामनवमीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २७ मार्च रोजी दुपारी ४ वाजता कुस्त्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कुस्त्यांचा जिल्ह्यातील कुस्तीप्रेमींनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन नियोजन समिती व समस्त गावकरी मंडळ रामतीर्थच्या वतीने करण्यात आले आहे.

बिलोली तालुक्यातील मौजे रामतीर्थ येथे पंचक्रोशीतील प्रसिद्ध असलेले रामकुंड इथे श्री राम नवमीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही कुस्त्यांचा फड आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील कुस्तीप्रेमींनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



विजेत्या पहेलवानांनाप्रथम पारितोषिक स्व. बापूराव पाटील खतगावकर व द्वितीयपारितोषिक स्व. रावसाहेब अंतापूरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील व परिसरातील कुस्ती पहेलवान यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नियोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## अर्धापूर येथे श्रीराम नवमीनिमित्त शोभायात्रा

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – भगव्या टोप्या घातलेली तरूणाई पारंपरिक वेशभूषेतील रामभक्तांचा उत्स्फुर्त सहभाग आणि प्रभू श्रीरामांच्या देखाव्यासह श्रीराम नवमीनिमित्त शहरात श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी जय श्रीरामाच्या जयघोषाने अर्धापूर नगरी दुमदुमली होती.

गुरुवार, दि. २६ मार्च रोजी म. बसवेश्वर चौकात श्रीराम मूर्तीची पूजा करीत हार घालून महाआरती करण्यात आली. म. बसवेश्वर चौक येथून शोभायात्रेला सुरुवात झाली. एका वाहनावर ठेवलेली प्रभू श्रीरामाची आकर्षक मूर्ती लक्ष वेधून घेत होती.



त्यासमोर ढोल पथक, प्रभू श्रीराम, हनुमान यांची प्रतिकृती, भजनी मंडळ यांचा शोभायात्रेत समावेश होता. त्याचबरोबर ढोल पथकांच्या तालावर व डीजेच्या तालावर तरुणाईने ठेका धरला होता. पू. अहिल्यादेवी होळकर चौक शहरातील प्रमुख मार्गावरून श्रीहनुमान मंदिर येथे आली. त्यानंतर आरती करून समारोप करण्यात आला. शोभायात्रेत श्रीराम भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

याप्रसंगी पोनि. चंद्रशेखर कदम यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. प्रत्येक चौकात भगव्या पताका लावण्यात आल्या होत्या. शोभायात्रेत श्रीराम भक्त व चिमुकले बालगोपाल मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी अभिषेक गुरखेल यांनी खिचडी तर सखाराम वारकड यांनी पाण्याची व्यवस्था केली होती.

श्रीराम जन्मोत्सवाची शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## अवैध मुरूम उत्खननावर कारवाई; ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**भोकर (प्रतिनिधी)** –भोकर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खननाविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ५५ लाख ३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई २५ मार्च २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास कांडली शिवारात करण्यात आली. मात्र, ही कारवाई पोलिसांनी केल्यामुळे आता महसूल प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भोकर तालुक्यातील कांडली शिवारात कोंडदेवनगर कमान ते कोंडदेवनगर जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या गायरान जमिनीत जेसीबीच्या साहाय्याने अवैध मुरूम उत्खनन आणि टिप्परमध्ये भरण्याचे काम सुरू होते.

पोलीस निरीक्षक अजित कुंभार मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत एक जेसीबी मशीन (किंमत ३५ लाख रुपये), एक टाटा कंपनीचा टिप्पर (क्र. एमएच-२६ सीएच-२४३८, किंमत २० लाख रुपये) अंदाजे ३ ब्रास मुरूम. या प्रकरणी जेसीबी मालक पेंटाजी येंडलवार, चालक जगदीश शर्मा, टिप्पर मालक स्वप्नील झपाटे आणि चालक दीपक गुरजवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना अटक करण्यात आली आहे.

वास्तविक पाहता अवैध वाळू उपसा आणि गौण खनिज उत्खननावर नियंत्रण ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी महसूल प्रशासनाची आहे. यासाठी महसूल विभागाने विशेष पथकेही नेमली आहेत. मात्र, महसूल पथक असतानाही अशी मोठी चोरी प्रशासनाच्या नजरेतून कशी सुटली? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

महसुल प्रशासनाच्या दुर्लक्षाने रोज दिवसारात्री वाळूच्या गाड्या भोकर शहरात व परिसरात येत आहेत. यावर महसूल प्रशासनाचे नियंत्रण राहिले नाही. अशा कारवाया करणे महसूल प्रशासनाकडून अपेक्षित असताना पोलीस प्रशासनाच्या या कारवाईमुळे दोन मोठे पेच निर्माण झाले आहेत. अनेकदा नागरिक जेव्हा अवैध वाळू, मुरूम वाहतूक, अवैध गुटाखा, अवैध दारू विक्रीची तक्रार घेऊन पोलीस ठाण्यात जातात, तेव्हा हे काम आमचे नाही, महसूल विभागाकडे जाणाऱ्या दुसऱ्या विभागाचे आहे असे सांगून बोळवण केली जाते. मग याच पोलिसांनी स्वतःहून ही कारवाई कशी केली, याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक राजेश्वर कळणे करत आहेत.

## शंकर गोरे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – शहरातील केशवराज नगर येथील रहिवासी प्रगतशील शेतकरी शंकर संताजी गोरे (वय ५२ वर्षे) यांचे हृदयविकाराने गुरुवार, दि. २६ मार्च रोजी दुपारी ४ वा. निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी स. १०- ३० वा. माळी समाज स्मशानभूमी अर्धापूर येथे अंत्यस्कार करण्यात येणार आहेत. शंकर संताजी गोरे यांच्या पश्चात पत्नी, ५ भाऊ, बहीण,२ मुले, पुतणे, सूना, नातवंडे असा परिवार आहे. ते दिगंबर गोरे, विश्वांबर गोरे, बाबुराव गोरे यांचे बंधू होत.



## ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत आरपीएफ नांदेडची कारवाई: दोन आरोपी अटकेत

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत विविध ठिकाणी यशस्वी कारवाया करून पुन्हा एकदा आपली तत्परता सिद्ध केली आहे.

पहिल्या घटनेत दि. २५ मार्च रोजी १२:३० वाजता परभणी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर आरएमएस कार्यालयाजवळ प्रवाशांच्या सामान चोरी प्रकरणांवर देखरेख करत असताना सहाय्यक उपनिरीक्षक अमोल वावळे यांनी एका संशयित व्यक्तीला प्रवाशांचे सामान चोरण्याचा प्रयत्न करताना पाहिले. तत्काळ कारवाई करत त्या व्यक्तीस पकडण्यात आले. सदर आरोपीचे नाव अजय असून तो मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्याचा रहिवासी आहे.



आरोपीस शासकीय रेल्वे पोलीस परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ६७/२०२६ अन्वये महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ११० व ११७ अंतर्गत दि. २५ मार्च २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या घटनेत त्याच दिवशी हनुमान मीणा, तसेच कॉन्स्टेबल/RPSF आर. के. मीना आणि के. के. मीना हे ट्रेन क्रमांक १७२०८ एक्सप्रेसमध्ये छत्रपती संभाजीनगर, लासूर दरम्यान नियमित गस्त घालत असताना, S-०८ डब्याच्या दरवाजाजवळ एक संशयित व्यक्ती आढळून आला. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव आकाश (वय २७ वर्षे), जिल्हा अहमदनगर येथील रहिवासी असल्याचे सांगितले. मात्र समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. तपासणीदरम्यान त्याच्याकडून २७ हजार ९९९ रुपये किंमतीचा विवो मोबाईल फोन जप्त करण्यात आला.

## वाजेगाव प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची ‘सेक्युलर फोरम’ची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील सामाजिक सलोखा आणि सांप्रदायिक ऐक्याची परंपरा जपण्यासाठी सेक्युलर फोरम, नांदेडची स्थापना करण्यात आली आहे. विविध धर्मनिरपेक्ष, संविधानवादी आणि सामाजिक संघटनांना एकत्र आणत प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला संविधानिक मूल्यांनुसार काम करण्यासाठी सकारात्मक दबाव गट (प्रेशर ग्रुप) म्हणून हे फोरम कार्य करणार असून, वाजेगाव प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी सेक्युलर फोरमच्यावतीने करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर नांदेड लोकन्याय विकास आघाडीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक तसेच विविध सेक्युलर संघटनांच्या प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक बुधवार, दि. २५ मार्च २०२६ रोजी हॉटेल विसावा, नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती. लोकन्याय विकास आघाडीचे चेअरमन आनंद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य समन्वयक फारुक अहमद यांनी बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीचे अध्यक्षस्थान इस्लाह-ए-म आशरा कमिटीचे संयोजक ॲड. अ. रहमान सिद्दीकी यांनी भूषविले.

यावेळी माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी महापौर अब्दुल सत्तार, लोकन्याय आघाडीचे नेते आनंद चव्हाण, माजी उपमहापौर शफी अहमद कुरेशी, सीपीआयचे नेते प्रदीप नागापूरकर, सीपीएमचे नेते गंगाधर गायकवाड, मनसेचे नेते अ. शफीक, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शंकर महाजन, उत्तर नांदेड जिल्हाध्यक्ष राज अटकोरे यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि वंचित आघाडीचे नगरसेवक तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. नौनिहालसिंह जहागिरदार यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थिती बैठक घेण्यात आली.

बैठकीत रमजान ईदच्या दिवशी वाजेगाव ईदगाह परिसरात घडलेल्या घटनेबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि कोणत्याही राजकीय दबावाविना चौकशी करण्याची ठाम मागणी करण्यात आली. प्रशासनाने कोणत्याही दबावाखाली न येता केवळ संविधान आणि कायद्याच्या आधारे काम करावे, असा एकमुखी सूर यावेळी उमटला. याशिवाय आगामी महामानवांच्या जयंती आणि विविध समाज घटकांच्या सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. नांदेडमधील धर्मनिरपेक्ष आणि संविधानवादी वातावरण अधिक बळकट करण्यासाठी संयुक्त उपक्रम राबवण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला.

सेक्युलर फोरमच्या माध्यमातून सर्व प्रगतिशील, लोकशाहीवादी आणि संविधानावर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांनी पुढे येऊन सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. नांदेडची धर्मनिरपेक्ष ओळख आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या वेळी नगरसेवक राहुल सोनसळे, सत्यपाल सावंत, राकापा-शेकापचे डॉ. मुजाहिद खान, रमेश गोडबोले, शाम कांबळे, विठ्ठल गायकवाड, साबेर चाऊस, कुलदीप राक्षसमारे, हबीब बावझीर, गौतम डुमणे, काझी नाफे, पाशा भाई, शोएब हुसेन, आकाश जोंधळे, ॲड. शेख बिलाल, विनोद वाघमारे, ॲड. शाहेबाज सय्यद, हाजी सईद खान, रहमत पहेलवान, ऋतुराज मोरे, जयराज गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.


फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com